## बापूसाहेबांचे बालपण ते वर्तमान आयुष्य
## (साथिदारांच्या लेखातील निवडक शब्दांतून)

इ.स. १९८८ पासून लोकांच्या चर्चेतून ऐकण्यात येते, की जर श्रीमती इंदिरा गांधी यांची हत्या झाली नसती, तर आज बापूसाहेब महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले असते.



www.Dudhgaonkar.in
वर अवश्य भेट द्या...

गौरवग्रंथातील संपुर्ण
लेख वाचण्याकरिता

# * दिवंगतांच्या भावना *

## एक सुसाट वादळी व्यक्तिमत्त्व

कै. डॉ. बलभीमराज गोरे

(प्राचार्य, शिवछत्रपती महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर)

- गणेशराव उर्फ बापूसाहेब अखेर एक माणूस आहे. माणूस म्हणजे माणूसच. अगदी तुमच्या - आमच्या सारखाच हाडामासाचा माणूस. फरक आहे तो इतकाच की आपल्या अंतःकरणात जिथे एक निरंतर तेवती 'ज्योत' आहे, त्यांच्या अंतःकरणात तिथे एक 'धगधगती ज्वाला' आहे. अखंड आग ओकणारी एक मशाल आहे. आपणास आपल्या अंगावर धाऊन येणाऱ्या, **आपणास हलवून - हेलाहून सोडणाऱ्या वादळाची भिती वाटते; पण गणेशराव स्वतः, स्वतःच्या ठिकाणी एक सुसाट वादळ आहेत.** त्यामुळेच कदाचित आयुष्यातील कोणतेही वादळ त्यांना एका मर्यादेपलीकडे विचलित करु शकले नाही.
- खरंतर बापू म्हणजे खूप मोठं ताकतवर व्यक्तिमत्त्व आहे. त्यांच्या संबंधाने लिहित असताना मला ऐनवेळी जे सुचले,जाणवले, भावले ते मी माझ्या समजुतीनुसार यत्किंचित हातचा न राखता इमान-इतबारे लिहिले आहे. **वस्तुतः बापू मी सांगितले त्यापेक्षाही खूप मोठे आहेत. एकाच लेखातून त्यांच्या समग्र व्यक्तिमत्त्वाचा परामर्श घेणे सोपे नाही. माझा तेवढा वकूब नाही, आवाका नाही की माझ्यात ती क्षमताही नाही. एखाद्या व्यक्तिमत्त्वास अनायास 'सुसाट वादळ' म्हटल्यानंतर अर्थातच, कोणा एकाच्या कवेत ते मावणारे नसते, हे कबूल करावे लागते , तेही ओघानेच. असो.**

## बापूसाहेब : कर्तृत्वाची धमक असणारे साहेब

कै. भुजंगराव नारायणराव कदम, पुर्णा, जि. परभणी

- **बापूसाहेब वसमत मतदार संघातून आमदार म्हणून निवडून आल्यावर पुर्णा साखर कारखाना त्यांनी उभा केला. त्यावेळी त्या साखर कारखान्यावर संचालक म्हणून मला त्यांनी संधी दिली. आज फार मोठ्या प्रमाणात पुर्णा सहकारी साखर कारखाना नावारुपाला आला आहे.**

## चारित्र्यसंपन्न व्यक्ती किंवा मूर्ती

कै. बाबुराव दत्तराव भालेराव, रिधोरा (हिंगोली)

- **महाराष्ट्रात सहकारी चळवळ सुरु झाली. त्यात अनेक व्यक्तिमत्त्व पुढे आली व या महाराष्ट्राची जडणघडण झाली. बापूसाहेबाच्या काळात अनेक कार्यकर्ते तयार झाले. परभणीमधून मा. रामप्रसाद बोर्डीकर, आ. सुरेश वरपुडकर, वामन मोरे, भोसले त्याचप्रमाणे वसमतमधून देवराव जाधव, उत्तम कदम, बालाजी पालीमकर, खलीलभाई, मंगलचंद गोरे, जावेदभाई इत्यादी कार्यकर्ते तयार झाले. म्हणून बापूसाहेब हे कार्यकर्ते तयार करणारे एक रसायनच आहे. बापूसाहेबाने कोणापुढे मान झुकवली नाही व ते सतत सत्याची पाठराखण करीत राहीले.**

## युवा नेते गणेशराव

कै. डॉ. बापू अडकिने, परभणी

इ.स. 1954

- मुसमुसत्या जवानीत बेधुंद हुंदडायच्या काळात आमची भेट झाली. भेट आणि मैत्री या दोन वेगळ्या घटना नव्हत्याच. एकाच घावात एकजीव! मी कृषीच्या शेवटच्या वर्षात आणि गणेशराव शिवाजीत बी.ए. च्या अंतिम वर्षात. विद्यार्थी संसद्चा जनरल सेक्रेटरी म्हणून मी कृषी महाविद्यालयात नुकताच निवडून आलो होतो. साधासुधा नाही अटीतटीची निवडणूक भलतीच रंगली होती. ती महाविद्यालयाच्या इतिहासात दणकेबाज ठरली. माझ्या त्यावेळच्या भाषण कौशल्याच्या जोरावर पॅनॉलमधून मी एकटाच आवाजी मतांनी निवडून आलो होतो. मुख्यमंत्री एकटाच एका पक्षाचा आणि मंत्रिमंडळ दुसऱ्या पक्षाचे असा पोरखेळ झाला होता. असे मंत्रिमंडळ जगाच्या पाठीवर झाल्याचे अजून तरी ऐकिवात

- नाही. भलेही तो पोरखेळ असेल; पण जागतिक इतिहासातला तो वेगळा नमुना होता, हे नक्की.
- त्यानंतर लगेच शिवाजीची निवडणूक लागली. गणेशराव विद्यार्थी संसदेच्या अध्यक्ष पदासाठी उभे होते. विरोधात होते विजय गव्हाणे. पोरासोराची निवडणूक असली तरी ती दोन राजकीय घराण्यांमधली चुरस होती. प्रचार सुरु झाला. वर्गावर जाऊन भाषण देणे, रात्री सांस्कृतिक सभागृहात सभा घेणे, गावात जिथे विद्यार्थी खोल्या करुन राहायचे तिथे घरोघर जाऊन भेटी घेणे. असा धूमधडाका सुरु झाला. विजय चांगला डिबेटर होता. स्टायलिश बोलायचा. त्याची टकराघुसारखी भाषणे पोरा- पोरींना भुरळ घालू लागली. त्याचा प्रभाव वाढू लागला. तशात मला पाहुणा म्हणून प्रचारासाठी बोलावणे आले. मला तो बहूमान वाटला. खूप आनंद झाला. शिवाजीत जाऊन भाषणे द्यायची मोठी पर्वणी वाटली. अभ्यास गुंडाळून क्लासेसला दांड्या मारुन मी गणेशरावांच्या टोळीत सामील झालो.
- टाऊन हॉलमध्ये पहिलीच सभा होती. परभणी शहरातल्या तमाम तरुणांचा तो भव्य जलसा होता. उत्साह, जोश, आनंद हॉलमध्ये आणि समोरच्या मैदानात तुडूंब भरला होता.
- मोजके मुद्दे योग्य शब्दात मांडल्यामुळे माझ्या प्रत्येक वाक्याला श्रोत्यांनी टाळ्या आणि शिट्ट्या वाजवून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. माझे भाषण संपताच गणेशरावांनी धावतच येऊन मला मिठी मारली. त्याचक्षणी आम्ही दोघे एकजीव झालो ! आम्ही जेव्हा केव्हा भेटतो तेव्हा दोघांचीही हृदये आनंदाने उचंबळून येतात एकमेकांना. बघून आनंद होणे, हे सच्च्या मैत्रीचे लक्षण आहे.
- झाले ! निवडणुकीचा रंग पालटला. फ. मुं. शिंदेना नुकतीच काव्यबाधा झाली होती. ते दररोज एक दोन कविता प्रसवू लागले. सुरेश जाधवच्या प्रतिभेला उकळी फुटू लागली. शफीने मराठीच्या लळ्यापायी उर्दूला तलाक दिला होता. हे पोट्टे पुढे मान्यवर होणार असल्याचे काळालाही कळले नव्हते. वसेकर, लबडे अशा दीडशे दोनशे टोळभैरवांची टोळी कामाला लागली आणि वातावरण गणेशमय झाले. घोषवाक्ये लिहायाची कोणीतरी कल्पना सुचवली.

  **काय होती घोषवाक्ये ?**

  जो गरजता है वो बरसता नही!

  आम्हाला सोन्याचे डुक्कर म्हणता, सोन्याचे गाढव व्हायला तुम्हाला कोणी रोकलेय?

  गर्वाचे घर खाली ! विजय मंदिराला पराजयाचा पाया !

  देव हवा की दानव?
- वगैरे वगैरे फक्त एवढीच अक्षरे पण वाचकांना बरोबर अर्थ कळायचा. कागदाच्या लांब रुंद पट्ट्यांवर बोरुने लिहिलेली ही घोषवाक्ये. रस्त्यातल्या भिंती भिंतीवर झळकू लागली. त्यामुळे वातावरण अधिकच अनुकूल होत गेले आणि गणेशरावांचा संपूर्ण पॅनॉल थंपिंग मेजॉरिटीने निवडून आला.
- **निवडणुकीचा धुराळा शांत होतो न होतो तोच ''महाराष्ट्र कृषी विद्यापीठ'' स्थापनेची चर्चा सुरु झाली. आंदोलन करायचे होते**; पण नक्की काय करायचे हे समजत नव्हते. होईल तेवढ्या पुढाऱ्यांच्या भेटी घेतल्या. कृषीमंत्री, मुख्यमंत्र्यांच्या भेटी घेऊन निवेदने द्यावी, असे मनात होते; पण मुंबईला जाणे-येणे मंत्र्यांच्या भेटी घडवून आणायची जबाबदारी एकाही पुढाऱ्यांनी घेतली नाही. मग आम्हीच निर्णय घेतला, विद्यार्थ्यांचा मोर्चा काढायचा आणि जिल्हाधिकाऱ्यांमार्फत शासनाकडे निवेदन द्यायचे. मोर्चाची तारीख ठरली. पोलिसांची परवानगी मिळाली. ठरल्याप्रमाणे बरोबर अकरा वाजता दहा हजार बालके आणि युवकांच्या मोर्च्याला सुरुवात झाली. वाजतगाजत जोरात घोषणा देत मोर्चाला सुरुवात झाली. बँडवाले, टांगेवाले सोडले तर मोर्चात एकही प्रौढ माणूस नव्हता. सर्व पोरासोरी मामला!
- धीम्या गतीने मोर्चा पुढे सरकत होता. बघणारांनी रस्त्याच्या दूतर्फा प्रचंड गर्दी केली होती. झाडून सर्व जनता घराबाहेर, दुकानासमोर उभी राहून कौतुकाने बघत होती. दुसऱ्या मजल्यावरच्या गॅलरीत बाया, मुली उभ्या होत्या. दर पंधरा मिनिटांनी मिरवणूक थांबायची. लेझीम पथके कवायत करायची. जोरजोरात घोषणा व्हायच्या. शिवाजी चौकात पत्रकार, फोटोग्राफर आले. कोणाच्या ध्यानी मनी नसलेले काहीतरी अजब घडत आहे, याची सर्वांना जाणीव झाली. कुठे थोडेही शिस्त ढळू न देता तो शांती मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकायला दुपारचे दोन वाजले. एवढा भव्य सुनियोजित स्वयंम्उत्साही आणि शांतीपूर्ण मोर्चा परभणीच्या इतिहासात आजतागायत झाला नाही.
- **बाहेरच्या गेटवर पोलिसांनी मोर्चा अडवला. फक्त पाच प्रतिनिधींना चर्चा आणि निवेदन देण्यासाठी बोलावले. जिल्हाधिकाऱ्यांचे दालन पुढारी आणि पत्रकारांनी खचाखच भरले होते.** आण्णासाहेब गव्हाणे, शेषरावजी देशमुख, लिंबाजीराव दुधगावकर, नखाते, बाबुराव पाटील

- गोरेगावकर, जामकर अशी त्यावेळची सर्व मातब्बर नेते मंडळी अगोदरच येऊन बसली होती. आम्ही दालनात प्रवेश करताच जिल्हाधिकाऱ्यांनी प्रश्नांची सरबत्ती सुरु केली. ते म्हणाले, ''एवढा मोठा मोर्चा काढायची काय गरज होती?'' नुसते निवेदन दिले असते तरी चालले असते.
- गणेशराव म्हणाले,'' साहेब हे निवेदन स्वीकारा आणि त्याचे काय करायचे ते करा, आम्ही विद्यार्थी प्रतिनिधी आहोत. तुम्ही आम्हाला बसायला खुर्च्या सुध्दा ठेवल्या नाहीत. तुमच्याशी उभे राहून बोलायला आम्ही गुन्हेगार नाहीत.'' हा बाणेदार गुस्सा खूप शोभला आणि बसलेल्या मंडळीला तेवढाच भावला. जिल्हाधिकारी थोडे ओशाळले. एका मिनिटातच फटाफट खुर्च्या आल्या. आम्हाला बसायला सांगितले गेले. गणेशराव म्हणाले, ''मोर्चाची गरज नव्हती असे आपण म्हणता, पण महाराष्ट्राचे लक्ष वेधण्यासाठी मोर्चा काढावा लागला. आम्ही चार दोघांनी निवेदन दिले असते तर कोणी दखल घेतली नसती. मोर्चा काढला म्हणून कृषी विद्यापीठाची मागणी काय आहे? ते परभणीकरांना कळले. पत्रकार आले. उद्या राज्यातल्या वृत्तपत्रात बातम्या येतील. महाराष्ट्राला आमच्या भावना कळतील. जिल्हाधिकारी म्हणाले, ''अहो पण तुम्ही शाळा महाविद्यालये बंद करुन मोर्चा काढला. तुम्ही विद्यार्थ्यांचे नुकसान करत आहात.'' दबक्या आवाजात मिश्किलपणे फ.मुं. म्हणाले, ''कुछ पाने के लिए कुछ खोना पडता है'' आवाज न काढता सगळे पोटातल्या पोटात हसले; पण जिल्हाधिकारी बिथरले. त्यांचा ताव शेंडीत उतरला. आपण सर्वज्ञानी सर्व हितकारी असल्याच्या आवेशात म्हणाले, ''तुम्ही गुंडागिरी करुन लहान मुलांना वेटीला धरता आहात. एक्सपर्ट कमिटी ठरवील तिथे विद्यापीठ होईल, कोणी मोर्चे काढले म्हणून ते मिळणार नाही आणि विद्यापीठ म्हणजे काय? हे कळते का तुम्हाला? सांगा बरं फॅकल्टी म्हणजे काय?
- हा प्रश्न ऐकून आमची डोकी फिरली. सर्वजण तटातट उठले. टेबलावर जोरात हात आपटून मी त्वेषाने म्हणालो, ''साहेब फॅकल्टी म्हणजे काय ? हे सांगितले तर तुम्ही विद्यापीठ देता का? आमचे निवेदन सरकारकडे पोचवायचे आपले काम आहे. प्रश्न विचारुन आमची परीक्षा घ्यायचा आपल्याला अधिकार नाही.'' असे म्हणून आम्ही तावातावाने बाहेर पडलो. आमची बॉडी लँगवेज कंपाउंड बाहेरच्या पोरांच्या लक्षात आली. गेट ढकलून प्रचंड लोंढा आत घुसला. जे दिसेल त्याची मोडतोड सुरु झाली. आवारातल्या बागेचा पूर्ण विध्वंस करुनच पोरं थांबली.
- दुसऱ्या दिवशी मोर्चाचे फोटो आणि बातम्या सर्व वर्तमानपत्रात आल्या. जिल्हाधिकाऱ्यांचे कसे चुकले? त्याची चौकटीत वर्णने आली. **मराठवाडा पेपरमध्ये अनंतराव भालेरावांनी विद्यापीठ मराठवाड्यातच का व्हावे? म्हणून जळजळीत अग्रलेख लिहिला.** विद्यार्थी मोर्चाचे सर्वच पेपरवाल्यांनी कौतुक केले. तेव्हापासून कृषी विद्यापीठाची मागणी जनतेच्या मनात धुमसत राहिली. **पुढे चार वर्षांनी पुन्हा ठिणगी पडली आणि संपूर्ण मराठवाड्याच्या जनतेच्या मनाचा भडका उडाला. सरकारला विद्यापीठ द्यावेच लागले.**

**अख्ख्या महाराष्ट्रात कृषी विद्यापीठाची मागणी करणारे पहिले युवा नेते गणेशराव होते, याची इतिहासाला नोंद घ्यावी लागेल.**

## गणनायक !

**कै. प्रा. सुरेश जाधव, परभणी**

- त्यावेळी प्राचार्य रामदास डांगे सर, उपप्राचार्य व समाजशास्त्राचे शिक्षक प्रा. उत्तम भोईटे सर त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. अनुराधा भोईटे मॅडम, मोहन सर, रत्नम सर, पटवर्धन सर, जोशी सर, बागल सर, धूत सर, बायस सर, प्रभाकर मांडे सर, रा.रं. बोराडे सर, करंडे सर किती किती नावे घ्यावीत. ह्या सर्व मंडळींनी केवळ अध्यापनाचं काम केलं असं नाही तर आमच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देण्याचं काम केलं, त्यातून पुढं आम्ही कधीच मागे वळून पाहिलं नाही.
- अशाच स्वरुपाचा आमचा एक मैत्रीचा संच निर्माण झाला होता. फ.मुं.शिंदे, शेख शफी, दत्ता चौगुले, ज्ञानोबा मुंढे, गणेश घांडगे, गोपीकिशन दायमा, साहेबराव लबडे, शंकर निकम, अरविंद शेळके, जयराम वराडे, किशन शिंदे, आत्माराम टेंगसे, मुरलीधर डहाळे, तत्त्ववादी भगिनी कु. जोशी, कु. ईनामदार, कु. पार्वेकर, कु. धामणगावकर असे किती तरी. या सर्वांना एकत्रित जुळवून ठेवण्यामध्ये ज्यांचा महत्त्वपूर्ण वाटा होता तो गणेशराव दुधगावकर यांचा. गणेशराव नागोराव शिंदेशाही राऊत दुधगावकर हे महाविद्यालयात गणेशराव या नावाने सर्व परिचित होते, ख्यातकिर्त होते, सर्वांचे जवळचे मित्र होते.
- गणेशरावांच्या व्यक्तिमत्त्वामध्ये एक प्रकारची आगळी किमया होती. **उंचपुरा बांधा शिवाजी महाराजांसारख्या मिशा,** गौरवर्ण, हसतमुख चेहरा, मधाळ स्वभाव व आपल्या लाघवी बोलण्याने ते समोरच्याला क्षणार्धात आपलसं करुन टाकायचे. मैत्रीचा, सहकार्याचा मदतीचा हात द्यायचे. **एका नामांकित राजकीय पार्श्वभूमी असलेल्या कुटुंबातून आलेला हा युवक आपल्या साध्या राहणीने, जिव्हाळ्याच्या बोलण्याने अल्पावधीतच लोकप्रिय झाला व एक युवा नेतृत्व क्षितीजावर उदयास आलं.** त्यांच्या बंधूंना आम्ही दादा म्हणत. सर्वदूर ते याच नावाने सुपरिचित होते. बँक व

- जिल्हा परिषद यावर अनेक वर्षे त्यांनी अनभिषिक्त अधिपत्य गाजवले.
- गणेशरावांचे अनेक युवक मित्र त्यांनी आयुष्यभर जोडून ठेवले. मधाच्या मोहाळाला कशा माशा चिटकून राहतात, तशा पद्धतीने सर्व स्तरातील सर्व क्षेत्रातील सर्व प्रकारची माणसं आयुष्यभर जोडून ठेवण्याची किमया त्यांनी केली.
- खरं तर हे एक आमचं कुटुंब होतं, आहे आणि भविष्यातही राहील. घरी येऊन टोपल्यातली भाकर जवसाच्या चटणीबरोबर खाणारे गणेशराव, खाली मांडी घालून आमच्याबरोबर मैफल जमवणारे गणेशराव, अनेक कार्यक्रमात, प्रवासात, विविध उपक्रमात रमणारे गणेशराव अजूनही आमच्या मनातल्या कोपऱ्यात सतत तेवणाऱ्या वातीसारखे तेवत आहेत.
- त्यांच्या जीवनातले चढउतार त्यांनी सहन केले. वैभव उपभोगले, मैत्रीला जागले, आता 'संध्या' काळचा त्यांचा पुढचा प्रवास सुखकर आणि समाधानाचा, उत्तम आरोग्याचा असण्यासाठी आमच्या अंत:करणपूर्वक कामना ! एवढेच.



2014 मध्ये जर शरद पवारांच्या जाळ्यात अडकले नसते
तर गणेशराव दुधगावकर शिंदेशाहीराऊत आजपर्यंत परभणीचे खासदार राहिले असते.
शिवसेनेने पहिल्यांदा मुंबई बाहेर दिलेले केंद्रीय मंत्रीपद
मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी 2024 मध्ये अशा उत्तुंग नेतृत्वालाच दिले असते.

**मुख्यमंत्री बदलण्यात प्रमुख भुमिका निभावणारे
मराठवाड्याचे कर्मवीर गणेशराव दुधगावकर यांची
त्यांच्याच साथिदारांच्या शब्दात पुढील 26 पानांत, 52 वर्षांची
चारित्र्यसंपन्न कारकिर्द...**

## बापूसाहेबांच्या बालपणापासून ते उतारवयापर्यंतच्या आयुष्याची मांडणी... साथिदारांच्या लेखातील निवडक शब्द...

### सर्व समावेशक नेतृत्व बापूसाहेब

**श्री. पंडित घांडगे, छत्रपती संभाजीनगर**

**सदिच्छा !**

तरुणाईचा विचार अजूनही बापूसाहेबांच्या मनी । परभणी जिल्ह्यातील युवा पिढीचा हा आहे मुकुट मणी ।।
विकासाची दृष्टी, सुबक कार्य शैलीचा नेता । सर्व समावेशक भावनेचा हा राजा असे जाणता ।।
सर्व सामान्यांच्या कामाचा आहे त्यांना कळवळा । कठिण समयातही त्यांनी सांभाळला जिवलग मावळा ।।
बऱ्याच वेळा जिवनात अंतर पडले संसारी । सातत्याने देह झिजविला सांती परोपकारी ।।

आयुष्याचे पाऊण शतक त्यांनी आज पार केले । पाळूनी शिस्त नेहमी ते शतकवीर होतील भले ।।
मित्रपरिवारा बरोबरच निसर्गाचाही ते आहेत सोबती । विविध तर्काने ते फुलवतात सुपिक शेती ।।
गर्भ श्रीमंतीचा आहे त्यांना लाभला वारसा । कुणी दाखवण्याची गरज नाही त्यांना वेगळा आरसा ।।
आम्हा पामरांच्या त्यांना सदैव आहेत शुभेच्छा । पूर्ण हावोत त्यांच्या मनातील सर्व इच्छा ।।

- **बापूसाहेबांचा कार्यकर्ता संच खूप मोठा होता.** त्यात अत्यंत जवळचे म्हणजे रामप्रसाद बोर्डीकर, अर्धे पि. ए. चे काम तेच करत. त्यानंतर सुरेश वरपुडकर, प्रा. राम घाटगे, भाऊसाहेब भोसले. गोपाळ तापडीया, वामन मोरे, अशोक शिंदे, शंकर निकम, मुंजाजी जाधव, जयप्रकाश दांडेगावकर, बालासाहेब काळे, सोपान नादरे, आडगावकर, माणिक आंबेगावकर, ॲड. माणिक कदम आणि बालासाहेब दामपूरीकर इ. **बापूसाहेबाची विश्रांती कमी व काम जास्त असे. कधी कधी रात्रभर जागरण होई व जेवणास अवेळ होई.**
- संपूर्ण महाराष्ट्रात बापूसाहेबांनी रोजगार हमीच्या विविध ठिकाणी अचानक दौरे करुन रोजगार हमीच्या कामातील अनियमीतता उघडी पाडली व त्यामुळे काही अधिकाऱ्यांना शिक्षा झाल्या. निलंबने झाली. **महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन रो. ह. यो. समितीचे अध्यक्ष वि. स. पागे यांनी बापूसाहेबांच्या कामाची खूप तारीफ केली.**
- परभणी जिल्हा परिषदेतील खरेदीचा घोटाळा बापूसाहेबांनी विधीमंडळात प्रश्न उपस्थित करुन सबंधीतास शिक्षा देण्यास भाग पाडले. संबंधित अधिकाऱ्यास पुन्हा मराठवाड्यात पदस्थान देऊ नये, अशी शिक्षा झाली.
- मार्च 1985 च्या पहिल्या आठवड्यात विधीमंडळाची मुदत संपणार असल्याने मंत्रीमंडळाची कारकिर्द संपुष्टात येणार हे जवळपास निश्चित झाले होते. तथापि बापूसाहेबांनी मला तू मुंबईत राहू नको, तुला परवडणारे नाही म्हणून त्यांनी स्वतः तत्कालीन वित्तमंत्री ना. सशीलकुमार शिंदे यांना पत्र लिहून माझी विशेष बाब म्हणून परभणी किंवा औरंगाबाद येथे बदली करावी, अशी विनंती केली व त्या पत्रावर मा. शिंदे साहेबांनी "He should be transfer as a special case and inform me" असा शेरा मारुन मा. संचालक लेखा व कोषागारे मुंबई यांना आदेशित केले. अन् माझी बदली औरंगाबाद येथे झाली व दिनांक 10-12-1985 पासून मी औरंगाबाद येथे आलो व स्थायीक झालो ते केवळ बापूसाहेबांमुळेच.



loksatta@expressindia.com

**वि. स. पागे हेच मनरेगाचेही मूळ जनक**

**'मनरेगाचे (दुहेरी) ढोल'** हा अभ्यासपूर्ण लेख (लोकसत्ता, ४ मार्च) वाचला. त्यातील एका महत्त्वाच्या बाबीची वाचकांना माहिती करून देण्याच्या दृष्टीने हा पत्रप्रपंच.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या कायद्याची मूळ कल्पना प्रसिद्ध व्यासंगी गांधीवादी नेते व महाराष्ट्र विधान परिषदेचे भूतपूर्व सभापती कै. वि. स. पागे यांची. महाराष्ट्रात 'रोजगार हमी योजना' या नावाने तिचे कायद्यात रूपांतर झाले. गरीब जनतेच्या कल्याणाविषयीची तीव्र तळमळ हा पागे यांच्या कार्याचा आत्मा होता. काम करण्यास तयार असलेला कोणीही उपाशी राहू नये, या तळमळीतून त्यांनी ही योजना तयार केली व ती महाराष्ट्र सरकारने स्वीकारावी, असा आग्रह तत्कालीन मुख्यमंत्री कै. वसंतराव नाईक यांना दीर्घकाळ केला; परंतु योजनेसाठी लागणारा खर्च सरकारला झेपणार नाही, या कारणाने नाईक ती योजना स्वीकारण्यास तयार होईनात. मग योजनेच्या खर्चासाठी छोटासा कर बसवावा, हा उपाय कै. पागे यांनी त्यांना सुचविला. तथापि, त्यानंतरही ही योजना स्वीकारण्याबाबत नाईक यांची चालढकल चालूच राहिली. मग पागे यांनी सर्वपक्षीय नेत्यांची एक बैठक बोलावून त्या बैठकीपुढे आपल्या रोजगार हमी योजनेबाबत चर्चा घडवून आणली. या चर्चेत योजनेच्या सर्व साधकबाधक अंगोपांगांचा सविस्तर विचार होऊन तिला अंतिम स्वरूप देण्यात आले. त्यानंतर तीवर सर्व उपस्थितांच्या सह्या घेऊन आपल्या निवेदनासह मुख्यमंत्री नाईक यांच्याकडे पागे यांनी ती योजना पाठविली. मग मात्र नाईक यांच्याकडून योजनेचा स्वीकार होऊन तिला विधेयकाचे स्वरूप देण्यात आले. या विधेयकावर विधानसभा व विधान परिषद दोन्ही ठिकाणी रीतसर चर्चा होऊन त्याचे कायद्यात रूपांतर झाले व ती सर्व महाराष्ट्रात लागू करण्यात आली.

वरील माहितीवरून कालांतराने केंद्र सरकारच्या 'महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने'चे मूळ जनक कै. वि. स. पागे हे होते, असे मानण्यास हरकत नसावी.

उल्लेखनीय बाब म्हणजे वरील योजनेच्या अंमलबजावणीसाठी 'रोजगार हमी मंडळा'ची स्थापना होऊन पागे त्याचे अध्यक्ष झाले; परंतु त्या पदाचे नाममात्र मानधन म्हणून ते मासिक फक्त एक रुपया घेत असत. त्या पदावर ते जीवनाच्या अखेरीपर्यंत कार्यरत होते.

(मी त्या वेळी विधानमंडळ सचिवालयात 'सभापतींचा स्वीय साहाय्यक व जनसंपर्काधिकारी' म्हणून कार्यरत असल्याने वरील घटनाक्रम 'चक्षुर्वैसत्यम्' म्हणून मान्य होण्यास प्रत्यवाय नसावा.)

**- वसंत वामन इनामदार, वांद्रे (मुंबई)**

रामप्रसाद बोर्डीकर (APMC वाशी संचालक-अध्यक्ष, आमदार), सुरेश वरपुडकर (1987 मा.आमदार), भाऊसाहेब भोसले (जि.प. उपाध्यक्ष), रतनलाल तापडीया (1988 आमदार, स्था.स्व.संस्था), मुंजाजी जाधव (1985 वसमत आमदार), जयप्रकाश दांडेगावकर (पुर्णा सहकारी साखर कारखाना अध्यक्ष, मा. आमदार मंत्री), माणिक आंबेगावकर (मा. आमदार) आणि बालासाहेब दामपूरीकर (1985 सिंगणापूर/पाथरी मा. आमदार) इ. सर्व जण बापुसाहेबांच्या सहकार्याने मोठ्या पदांपर्यंत पोहोचली.



## Vitthal Sakharam Page

Vitthal Sakharam Page was born on 21st July 1910 at Bagani in Satara District of Maharashtra. After his graduation, he completed his L.L.B., degree from Mumbai University. His long career covered economics, politics, education, religion, philosophy, literature, social service, culture etc. He also took part in the freedom movement and had underwent imprisonment.

He was elected to the Bombay legislative Council successively in 1952 and 1954 and to the Maharashtra Legislative council in 1960, 1966, and 1972 and was its Chairman from 1960 to 1978. During this period he was also Joint President of the Maharashtra Branch of the Commonwealth Parliamentary Association.

He made valuable contribution to various fields of public life. He was a prominent and leading member of several important Committees, Boards and Institutions. He was a veteran Gandhian Congress leader. He was Secretary and President of Sangli District Congress Committee and member of All India Congress Committee.

In 1965, he formulated the Integrated Area Development Scheme, popularly known as "Page Scheme" for the integrated development of village areas and the amelioration of small land holders, traditional artisans and agricultural labourers. In 1949, when the Constitution of India was being drafted, he wrote an article "Rojgaracha Hakk" (Right to Employment) and demanded employment guarantee as a fundamental right. In 1969, he persuaded the Government of Maharashtra to implement an employment guarantee scheme on a pilot basis in village Visapur in Sangli District, an unparalleled contribution for the upliftment of weaker sections.

In 1977, the State Legislature of Maharashtra adopted Employment Guarantee Act and passed it unanimously. His life mission was to see that this Scheme is implemented in the entire nation. As Chairman of the Maharashtra State Khadi and Village Industries Board, he implemented the Employment Guarantee Scheme for rejuvenating the age-old traditional village industries and to provide employment to the unemployed village artisans.

His vast knowledge and experience in the field of Parliamentary practice was effectively utilised by the Union Government. He was honoured with "Dalit Mitra" and Nyayaratha Ramshastri Prabhune Puraskar and regarded as "Father of Employment Guarantee Scheme". Shri Page was a deeply religious and spiritual person. He authored a few books in Marathi and English mainly on philosophical and religious subjects.

He had visited U.K., U.S.A., Canada, Japan and U.S.S.R representing the Commonwealth parliamentary Association, Maharashtra Branch. He passed away on 16th March 1990.

Indian Post is happy to issue a commemorative postage stamp on Vitthal Sakharam Page.

**Credits :**

| | | |
|---|---|---|
| Text | : | Based on materials provided by the proponent |
| Stamp/FDC/ Cancellation | : | Nenu Gupta |

**DEPARTMENT OF POST, INDIA**

### TECHNICAL DATA

| | | |
|---|---|---|
| Date of Issue | : | 21 July 2011 |
| Denomination | : | 500 P |
| Stamps Printed | : | 0.3 Million |
| Printing Process | : | Wet Offset |
| Printer | : | ISP Nasik Road |

© Department of Posts, Government of India. All rights with respect to the stamp, first day cover and information brouchure rest with the Department.

Price: ₹ 2.00







श्री. विठ्ठलराव पागे यांचे सुपुत्र CA श्री. प्रकाश पागे,
DTE संचालक श्री. महाजन तसेच नावाजलेल्या उद्योजकांसोबत
महाराष्ट्र चेंबर आयोजित दृष्टिकोनाचे महत्व या चर्चासत्राच्या आठवणी
(आयोजक : श्री समीर दुधगावकर, जुन 2014)



## मुद्रावंत आयुष्याचा शिल्पकार !

**कवी प्रा. जयराम खेडेकर**

तू घरंदाज, खानदानी दूधगावकरांच्या,
घरंदाज घराण्याची
कुळवंशी भाग्यवंत धनरेषा
डोळ्यांच्या बुबुळांवर नियतीने कोरल्या
अफाट अमर्याद बलवंत दिशा

दूधगावच्या पवित्र काळ्यामातीचा
मस्तकी टिळा लावून
कर्मकर्तृत्वाचा तू शिल्पकार
दुर्दम्य इच्छाशक्तीचा धीरोदात्त योद्धा
तु हुन्नरी, हिकमती, मुत्सद्दी म्हणून

कोरलेस देखण्या स्वप्नाचे
अमीट शिलालेख
दाहीदिशांना वैभवी बिरुदे लावून
जिद्द, चिकाटी, सत्वशील

तुझे पंख
त्यामुळे अफाट अमर्याद आभाळ
तुझ्या कवेत आले
तु सृजनकांत
नवनिर्मितीचा निर्माता म्हणून
वैभवी सत्कार, सन्मान

तुझे घर पुसत आले
शिरपेची खोवलेले तुरे धन्य झालें
तू संध्येचा उजळ दिवा
म्हणून संपूर्ण प्रकाशमान झालास
अमृतमहोत्सवी वर्षाचं
अप्रुप देखणं आयुष्य
सर्वांसाठी उधळीत आलास !

## भावनाशील व संवेदनशील गणेशराव दुधगावकर

**प्रा. डॉ. अजय गव्हाणे, नांदेड**

- आणखीन एका बाबीचा उल्लेख करण्याचा मोह होत आहे. तो म्हणजे श्रीमती इंदिरा गांधी गणेशरावजींना कुठेही भेट झाल्यानंतर ''बापूसाहेब....क्या चल रहा है?'' असे आवर्जून विचारत असतं. केवळ परभणीच नाही तर मराठवाड्यासाठी ही भूषणावह बाब आहे. **एक आंतरराष्ट्रीय दर्जाच्या नेत्या आमच्या अवतीभवती असलेल्या, आमच्या सहवासात असलेल्या नेतृत्वाला नावाने पुकारत असत.**



## काहीसे खोडकर... काहीसे हळवे... पण अभ्यासू गणेशराव

**श्री. उत्तमराव दाजीसाहेब कदम, पूर्णा जि. परभणी** — इ.स. 1954




- पूर्णा येथील जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शाळेत त्यांनी इयत्ता चौथीपासून सातवीपर्यंत चार वर्षे शिक्षण घेतले. त्यावेळी मी, भुजंगराव कदम, साहेबराव कदम, दिवंगत सीतारामअप्पा एकलारे, मारोतराव कदम, फौजी शेषेराव कदम, नागोराव निळेकर आम्ही सोबत शिकायला होतो. त्यावेळी आम्हाला पांडे गुरुजी, बाजीराव पारवे गुरुजी, डाफने गुरुजी, इनामदार गुरुजी शिकवायला होते. गणेशराव मुळातच अभ्यासात हुशार होते. त्यामुळे सर्व गुरुजनांचे ते लाडके होते.
- इतिहास व चित्रकला हा विषय तर त्यांच्या खूप आवडीचा होता. मला आठवते त्यांनी एकदा चित्रकला स्पर्धेसाठी विक्रमादित्य यांचे चित्र काढले होते. त्या चित्राला पारितोषिक मिळाले होते. त्यांना कबड्डी या खेळाची तर खूप आवड होती. शाळेत तर ते कबड्डी खेळतच; पण ग्रामीण भागातील कानखेड, निळा, खुजडा आदी गावात कबड्डीचे सामने असले की, खेळायला जात असत. त्याकाळी वाहनांची सोय नसल्याने पायीच जावे लागायचे.
- एरंडेश्वर, कंठेश्वर, गौर येथील शिवालय, गंगाजीबापू, धनगर टाकळी येथील दाजीगुरु देवस्थान या ठिकाणी ते दर्शनासाठी नेहमी पायीपायीच जात होते. लहानपणापासूनच ते धार्मिकवृत्तीचे होते. तीच बाब त्यांनी आमदार, खासदार, मंत्री झाले तरी सोडली नाही. तसेच बालमित्रांचे त्यांना विस्मरण झाले नाही. **मला आठवते त्यांनी दहा पैसे घंट्याने सायकल किरायणे घेत येथेच सायकल शिकली. आम्ही कधीकधी शेतात जात असू, रानमेवा खात असू, पूर्णा नदीत पोहत असू.**
- बाजीराव पारवे गुरुजींचा त्यांच्यावर खूप जीव होता. दर सोमवारी ते आठही जणांना खर्च करण्यासाठी दहा-दहा पैसे देत; पण गणेशराव मात्र हुशार व नम्र असल्याने पंचवीस पैसे देत. त्यातून ते लालाच्या हॉटेलमधील प्रसिद्ध गुलाब जामून, बर्फी व चिवडा खात असत. कधी कधी त्याचा लाभ मलाही मिळत असे. रेल्वे स्थानकावरील प्रसिद्ध मुगवडे खायला जात असत. ते त्यांना खूप आवडायचे. आजही आम्ही निवांत भेटलो की, त्या मुगवड्याचा विषय काढतात व खायची इच्छा प्रदर्शित करतात. इतकी वर्ष झाले तरी त्यांनी आपल्या काळजात येथील लहानसहान आठवणी साठवून ठेवल्या आहेत. पूर्णा हे ऐतिहासिक शहर आहे. रेल्वेचे प्राचीन वैभव आहे. अशा शहरात आपण राहिलो, शिकलो. याचा त्यांना खूप अभिमान वाटतो. पूर्णेची माती श्रम करणारांची, खेळाडू, कलावंत व ज्ञानवंतांची कदर करणारी व प्रतिष्ठा वाढवणारी आहे. या शब्दात गणेशराव येथील माणसांचा गौरव करतात. तेव्हा आमचा ऊर भरुन येतो. त्यातून त्यांचा या माती व मातीतील माणसांच्या विषयीचा कृतज्ञता भाव प्रदर्शित होतो.



- **गणेशरावांना थोरा-मोठ्यांची भाषणे ऐकायची तर खूप आवड होती. पूर्णा हे चळवळीचे केंद्र असल्याने येथे सातत्याने थोरामोठ्यांच्या सभा होत असत. आम्ही शिकायला होतो तेव्हा त्यांनी एस.एम. जोशी, आचार्य प्र.के. अत्रे, नानासाहेब गोरे यांच्या सभांना उपस्थिती लावली होती. त्याकाळी संयुक्त महाराष्ट्राची चळवळ सुरु होती. एखादे भाषण ऐकले की, त्यानंतर आठ-आठ दिवस ते त्या भाषणावर चर्चा करत.**

## संपन्न व्यक्तिमत्वाचा राजकारणी ॲड. गणेशराव दुधगावकर

**ॲड. अशोक सोनी, परभणी** — इ.स. 1975

- **परभणी जिल्ह्याचे काँग्रेसी परंपरेतील दिग्गज राजकारणी बापूसाहेबाच्याच सहवासात तयार झालेली आहेत.** परभणीच्या राजकारणात पुढे यशस्वी झालेले आणि जिल्ह्याचे राज्य पातळीवर नेतृत्व करणारे आ. सुरेश वरपुडकर असोत की मा. रामप्रसाद बोर्डीकर असोत एकेकाळी बापूसाहेबाच्याच तालमीत तयार झालेली आहेत.

## एक दिलदार लोकप्रिय माणूस

प्रा. दिनानाथ फुलवाडकर, गंगाखेड जि. परभणी

इ.स. 1955

- मा. बापूसाहेब म्हणजे आमचे गणेशराव यांचे संदर्भातील मागील दिवस आठवू लागलो. गणेशराव आमचे वर्ग मित्र. पूर्णा येथील अॅडेड (अनुदानीत हायस्कूल आजची अभिनव विद्या विहार) हायस्कूल गावाच्या बाहेर पाच किलोमीटर दूर असलेली. ती शाळा पूर्णा गावचे वैभव होते. भोवतीच्या खेड्यापाड्यातून विद्यार्थी शिक्षणासाठी धापा टाकीत तेथे येत असत.
- **गुरुवर्य बाजीराव पारवे यांचे मार्गदर्शनाखाली दुधगावकर कंपनीचे आगमन हायस्कूलमध्ये झाले. वर्गात सर्वजण एकदम प्रवेश करीत.** मागील बाकावर बसून लक्ष देऊन ऐकणे, तास संपल्यानंतर सर्वजण एकदमच निघून जात. या सर्व मित्र कंपनीचे नेतृत्व प्रामुख्याने गणेशरावच करीत. काही अडचण असल्यास समोर येऊन तेच मांडीत. शिक्षकाकडून मुख्याध्यापकाकडून सोडवत असत. नेतृत्वाचे गुण या दिवसांपासून त्यांचेमध्ये प्रकर्षाने जाणवत होते.
- सर्वश्री. उत्तम पारवे, गंगाधर राऊत, गणेशराव यांचेसोबत भुजंगराव कदम, साहेबराव कदम हेही असत. हायस्कूलमधील त्यांचा वावर वर्गापुरताच होता. तरी त्यांच्यामधील धैर्य, आत्मविश्वास आणि आपुलकी याचेही दर्शन येता जाता चालण्या बोलण्यातून जाणवत असे. सुट्टी लागली, की ही सर्व मंडळी गावी निघून जात. **परत शाळा सुरु झाली की, 'धाडधाड' करीत सर्वजण मिळूनच वर्गात प्रवेश करीत. त्यांच्या त्यावेळच्या बोलण्यातील रुबाब, स्पष्टवक्तेपणा आणि एकोप्याची भावना मनावर प्रभाव करुन जात असे. पारवे गुरुजी आणि दुधगावकर कंपनी यामधील मतेक्य अजोड होते.** आम्ही सारे लहान. बऱ्याच गोष्टी विचाराच्या पलीकडच्या असल्यामुळे त्याचा फारसा विचारही आम्ही करीत नसू.
- गणेशराव व मित्रमंडळ यांचे राहणे महादेव मंदिराजवळ होते. आमचेही घर तेथेच असल्यामुळे जाता-येता ही सर्व मंडळी नजरेस पडत. **त्यांच्या एकोप्याचे मनातल्या मनात अप्रूप वाटत असे, हे मात्र निश्चित.**
- गणेशराव म्हणजे एक धडपणारे व्यक्तिमत्त्व ! स्वस्थ कधी बसणार नाही. सामाजिक, राजकीय, शैक्षणिक अस्वस्थता हा त्यांचा मूळपिंडच म्हणावयास हवा. गणेशराव खऱ्या अर्थाने प्रकट झाले ते विकासाच्या आंदोलनामुळे ! मराठवाडा कृषी विद्यापीठ आंदोलन, मराठवाडा विकास आंदोलनात त्यांनी विद्यार्थी असताना जी उडी घेतली, ते केवळ सत्तेच्या अभिलाषेमुळे नव्हे तर मागास मराठवाड्याच्या विकासाच्या ध्यासामुळे ! विकास ध्यास हा त्यांचा नित्याचा, निरंतराचा श्वासच होय, असे म्हटले तर वावगे ठरु नये.
- आंदोलनातील त्यांची भूमिका कणखर बाण्याची होती. 'मोडेल पण वाकणार नाही' या बाण्यामुळेच ते लोकप्रेमातून 'बापूसाहेब' बनले, असे मला प्रांजळपणे वाटते.

## श्री. गणेशराव दुधगावकर : एक कार्यमग्न व्यक्तिमत्त्व

डॉ. दत्ता भगत, छ.संभाजीनगर

- 1962 ते 1972 हा मराठवाड्यातील उच्च शिक्षण क्षेत्रातला विस्तारयुगाचा कालखंड. 1962 पर्यंत मराठवाड्यात चार सार्वत्रिक निवडणूका होऊन गेलेल्या होत्या, अडीचशे वर्षाचा सरंजामशाही वातावरणाचा इतिहास असणाऱ्या मराठवाड्याला सार्वत्रिक निवडणूक म्हणजे काय? याची मुळीच माहितीच नव्हती. त्यामुळे पहिल्या निवडणुकीच्या आधी अथवा ती निवडणूक सुरु झाली त्यावेळी संसद, विधानसभा, नगरपालिका, मतदान या सारखे शब्दसुध्दा ग्रामीण भागात पोचले नव्हते. दुसरी सार्वत्रिक निवडणूक संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीमुळे थोडीबहुत का होईना प्रबोधन युगाचा प्रकाश पोचवू शकली. तिसऱ्या आणि चौथ्या निवडणुकीच्या काळात मराठवाडा हा खऱ्या अर्थाने आधुनिकीकरणाच्या प्रश्नांमुळे जागा होऊ लागला होता; पण तोपर्यंत स्वातंत्र्य चळवळीतली ध्येयवादी पिढी वृध्दत्वामुळे अस्तास पोचू लागली होती. परंपरेने चालत आलेल्या चौथाई सरदेशमुखीला लोकशाहीतील तत्त्वांशी सुसंगत करुन घेत सरंजामशाही वातावरणाचेच पुनरुज्जीवन कसे करता येईल, ही प्रवृती उदयाला आली होती. अशा वातावरणात लोकशाही जीवनपध्दती ग्रामीण जीवनात रुजवने हे एक फार मोठे आव्हान होते, अशा काळात गणेशराव दुधगावकर उदयाला आले.
- मराठवाडा प्रदेश मागासलेला होता म्हणून खरी खोटी सहानुभूती दाखवत ईथे विकासाचे काही प्रयोग सुरु झाले. **या वातावरणाचा गैरफायदा घेत पुढे येणे त्या काळात काहीसे सुलभ होते. असे असले तरी हे सर्व मोह बाजूला ठेवून ज्यांनी लोकशाही जीवनमूल्यांशी तडजोड न करता विकासकामे केली अशा तरुणांपैकी गणेशराव दुधगावकर होते.**

# राजकारणी नसलेला राजकारणी !

श्री. अनंतराव उमरीकर, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद)

इ.स. 1965



- त्या काळात गणेशरावांचे मोठे भाऊ श्री. लिंबाजीराव दुधगावकर यांची माझी केवळ ओळखच नव्हती तर मी पत्रकार असल्यामुळे नोकझोकही व्हायची. तशी राजकारणातील अनेकांशी व्हायची. तो पावेतो गणेशरावांना मी एक विद्यार्थी म्हणूनच ओळखत होतो. त्या काळात गणेशरावांच्या वाटचालीच्या पाऊलखुणा दिसत नव्हत्या. तसं त्यांच्या घरात राजकारण होतं. त्यामुळे या पाऊलखुणा उमटायला फार काळ लागला नाही. लवकरच कृषी विद्यापीठ संस्थापनेच्या निमित्ताने विद्यार्थ्यांनी आंदोलन छेडलं आणि त्या आंदोलनात आम्ही व्यावसायिक, पत्रकार ओढल्या गेलो. **तेव्हा मात्र विद्यार्थी चळवळीत अग्रभागी राहून गणेशरावांनी नेतृत्वाचा झेंडा रोवला.**
- **मराठवाड्यातील नेत्यांना त्यातही परभणीतील नेतेगणांना राजदरबारी फारशी किंमत दिली जात नाही, याची त्यांना जाणीव झाली आणि त्यांनी पक्षत्याग केला आणि शिवसेनेत त्यांनी प्रवेश केला आणि परभणीत शिवसेनेचे खासदार म्हणून ते निवडूनही आले;** पण तिथेही ते फार काळ टिकू शकले नाहीत. त्यापुढे शरद पवारांच्या जाळ्यात अडकले आणि शिवसेनेतून राष्ट्रवादीत प्रवेश करते झाले. ही त्यांच्या राजकारणातील अंताची सुरुवात होती. **वरकरणी हे पक्षबदल लोकांना त्यांच्या अस्थिरतेचं लक्षण वाटत असले तरी मला तसं वाटत नाही.**
- त्यांचा माझा वैयक्तीक पातळीवर संबंध आला तो परभणीच्या गोरक्षण या मृतप्राय संस्थेच्या शेकडो एकर मालमत्तेची होत असलेल्या लुटमारीच्या प्रश्नावरुन. याबाबत आवाज उठवण्याच्या प्रश्नाला त्यांनी हात घातला आणि नेमकं या कामासाठी त्यांनी एक वकील म्हणून माझ्याशी संपर्क केला आणि तेव्हापासून त्यांच्या स्वभावाचा, एकेक पैलू माझ्या लक्षात यायला लागला. त्यांनी जेव्हा या प्रश्नाला हात घातला तेव्हा त्यांचा राजकारणातील खासदारकीचा काळ संपलेला होता
- गोरक्षण प्रकरणामुळे त्यांच्या आणि माझ्या बऱ्याच वेळा एकत्र बैठका झाल्या. या काळात राजकारणातील सापशिडी व्यवहाराची काहीशी झलक पहायला मिळाली. ॲड. गणेशराव दुधगावकरांनी परभणीतील गोरक्षणाची जमीन वाचविण्यासाठी अतिशय चिकाटीने प्रयत्न केले. या अनुभवावरुन गणेशराव काही शिकले असतील तर ते एवढचं की, 'प्रयत्ने वाळूचे कण रगडीत राहणं' एवढचं आपल्या हातात आहे. त्यावर कार्यवाहीची अपेक्षा करणं शहाणपणाचं नाही हेच. तरीही आपण खटपटीत रहायचं. **मला वाटतं यातून ते गीतेत म्हटल्याप्रमाणे 'कर्मने वाधिकारस्ते' म्हणतात ना ते असावं. म्हणून गणेशराव एवढ्यावर थांबले नाहीत. ते तर दत्ताजी शिंदेच्या परंपरेतले पांडव. तेव्हा 'बचेंगे तो और भी लढेंगे'. या कार्यासाठी गणेशरावांनी अनेक नेत्यांना निवेदने दिली.**




- झालं असं होतं की, कृषी गोसंवर्धनच नव्हे तर मराठवाडा औद्योगिक विकास संस्थेने घेतलेले सारे उपक्रम एकेक करुन अवसायनात निघाले आणि हे कर्ज भागवण्यासाठी परभणी गोसंवर्धन प्रकल्पाची सारी मालमत्ता म्हणजेच शेतजमिनी विक्री करण्याचा घाट घातला. त्यासाठी सरकारी पातळीवरुन मान्यताही मिळवण्यात आली आणि विक्रीसाठी निविदाही मागवण्यात आल्या. नेमकं या वेळेस गणेशरावांनी या प्रश्नाला हात घातला. आम्ही तातडीने कोर्टात धाव घेतली आणि कोर्टाकडून स्थगनादेश मिळवला. त्या विरुद्ध 'गोसंवर्धन प्रकल्प' ही संस्था हायकोर्टात गेली. तिथे त्यांच्या हाती काही आलं नाही. जिल्हा न्यायालयातही स्थगनादेशाविरुद्ध अपील केलं. तिथेही यश मिळालं नाही आणि संस्थेच्या मालमत्तांना संरक्षण मिळवण्यात यश मिळवलं.
- विद्यार्थी दशेत असताना कॉलेजमध्ये त्यांच्यासोबत असलेल्या मित्रांना त्यांनी आपल्या संस्थेत महत्त्वाच्या जागेवर बसवलं. त्यांची जात-पात, वशिला वगैरे काहीही न पाहता; पण राजकारणात हे असं चालत नाही. तिथे यशस्वी होण्यासाठी जो कावेबाजपणा पाहिजे, अपमान गिळून गप्प बसण्याची जी वृत्ती पाहिजे ती गणेशरावांची नाही. त्यांचा स्वभाव म्हणजे स्वच्छ, तळातली खडी स्वच्छ दाखवणाऱ्या नितळ पाण्याप्रमाणे आतबाहेर जे आहे ते स्पष्ट दाखवणारा त्यांचा स्वभाव आहे. राजकारणात या अशा निर्मळ स्वभावाला भोळेपणा म्हणतात. **त्यांचं बोट धरुन अनेक जण राजकारणात आले; पण राजकारणात स्थिर होताच त्यांनी गणेशरावांच्या मदतीची शिडी फेकून दिली आणि गणेशरावांच्या**

- **विरोधात ते उभे राहिले;** पण म्हणतात ना 'सत्य संकल्पका दाता भगवान' तसं झालं. त्यांच्या या प्रयत्नांना राजकारण्यांनी साथ दिली नाही तर न्याय संस्था मदतीला आली आणि गोरक्षणच्या जमिनी आता पावेतो तरी सुरक्षित राहिल्या आहेत.

## राज्याच्या राजकारणाला कलाटणी देणारा आणि नेतृत्व ठरविणारा नेता

**श्री. मुश्ताक अहमद, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद)** इ.स. 1980

- त्यांनी निर्माण केलेल्या संस्था ज्याद्वारे अनेकांना रोजगार तर मिळालाच परंतु भावी पिढीला ज्ञानाचा मार्ग दाखविला. यातून अनेक पिढ्या निर्माण झाल्या. अनेकांचे संसार थाटले गेले. शेतीद्वारे समृध्दी आली. मराठवाड्यात सर्वाधिक सिंचन क्षेत्र असलेला जिल्हा म्हणून परभणीचा उल्लेख होतो. त्याचे श्रेय गणेशराव दुधगावकर यांना द्यावे लागेल. त्यावेळच्या काँग्रेसच्या राजकारणात अत्यंत महत्त्वाचे स्थान दुधगावकरांना होते. **महाराष्ट्राचे नेतृत्व ठरविणाऱ्यापैकी एक म्हणजे बापूसाहेब होते.**
- औरंगाबाद विधानसभा मतदारसंघातून 1980 मध्ये अब्दुल अजिम काँग्रेसकडून निवडूण आले होते. मी अजिम यांचा कार्यकर्ता होतो. त्यावेळी दुधगावकर वसमत मतदारसंघातून विजयी झाले होते. दुधगावकरांचं काँग्रेस हायकमांडजवळ वजन होते. राज्याच्या राजकारणात त्यांचा दबदबा होता. मी व इतर पदाधिकारी मिळून दुधगावकरांना भेटलो आणि अब्दुल अजिम यांना आपल्यासोबत मंत्रीमंडळात काम करण्याची संधी द्यावी, अशी विनंती केली. दुधगावकरांना बापूसाहेब या टोपन नावाने ओळखले जाते. एकदा त्यांनी शब्द दिला की काम झाले म्हणून समजा. अजिम यांना मंत्री केल्यास मराठवाड्याच्या विकासाचे प्रश्न धसास लावता येतील, असे त्यांना समजावले. यावर **बापूसाहेबांनी आम्हाला शब्द दिला आणि त्याप्रमाणे कामही झाले. अब्दुल अजिम बापूसाहेबांसोबत मंत्री झाले.**
- परभणी येथील सर्व विधानसभा मतदारसंघांची उमेदवारी 1984 मध्ये दुधगावकर यांच्या सांगण्यावरुन देण्यात आली होती. **त्यांनी सर्वजणांना निवडून आणल्याने त्यांचे पक्षात वजन अजूनच वाढून गेले होते.** मराठवाड्यातील अल्पसंख्यांकांच्या हितासाठी त्यांनी नेहमीच प्राधान्य दिले. **शंकरराव चव्हाण यांना मुख्यमंत्री बनविण्यात बापूसाहेब अग्रेसर होते.** मराठवाड्याच्या वाट्याला मुख्यमंत्रीपद यावे यासाठी पक्षाच्या स्तरावर त्यांनी भूमिका लावून धरली होती. त्याचा **परिपाक शंकरराव चव्हाण यांना मुख्यमंत्रीपद मिळाले.**

## आम्हा सर्वांचेच लाडके.. बापूसाहेब..!
## निखालस, स्पष्टवक्ता, अजातशत्रू असं व्यक्तिमत्त्व

**श्री. अरविंद कुलकर्णी, छ. संभाजीनगर** इ.स. 1984

- **लिंबाजीरावांनी दृढ केलेला पाया, व्यक्तिगत पातळीवर जनसंग्रह वाढवत जाण्याची कला व जातीभेद दुर्लक्षून कार्यकर्ते जोडण्याचा निसर्गदत्त असा पिंड व बिलकूल अजातशत्रू ह्या शब्दात ज्याच वर्णन करता येईल असं हे व्यक्तिमत्त्व. सत्तेत असो वा नसो; पण गणेशरावजी बोलत आहेत म्हटल्यावर शांतपणे लक्ष देऊन ऐकणाऱ्या नेत्यात महाराष्ट्राचे सर्वच मुख्यमंत्री लक्ष देऊन बसलेले आम्ही पाहिलेले आहेत.**
- प्रादेशिक विकासासंदर्भातला, शिक्षण विषयातला त्यांचा अभ्यास व तत्संबंधाची प्रामाणिकता सर्वमान्यच असायचे. मराठवाड्यातील एक तरुण तर्क अश्या नामाभिधानानं गौरव करावा, असे वाटणाऱ्या नेत्यांपैकी हा एक नेता जनसामान्यांना भावणारा ! एक झपाटलेला प्रांजळ व प्रामाणिक कार्यनिष्ठांविषयी आग्रहीपणाने मांडणारा हा कडक पिळदार मिशांचे व्यक्तिमत्त्व लाभलेला नेता. परभणी युवा विश्वाच्या गळ्यातला ताईत होता.
- दोनदा एम.एल.ए. चे टर्म व एकदा खासदार म्हणून दिल्लीत ज्याने परभणीचाच नव्हे तर विभागाचेच प्रतिनिधित्व केलं त्या कर्तबगारीच्या काळाचे आम्ही सारेच साक्षीदार होतो. कोण कोणत्या पक्षाचा आहे? त्यापेक्षा खरोखरच 'विकास' केंद्रित प्रश्नांवर खंबीरपणे भूमिका घेणारी व्यक्तिमत्त्वे निवडून यावीत, असाच आम्हा सर्वांचा प्रयत्न असायचा. मतभिन्नताही होत्या; पण स्नेहाचा धागा हा अधिक पक्का, शासनाला कामाला जुंपणे, विकासाची कामे रेंगाळायला नकोत,जेवढ्या म्हणून शासकीय सुविधा तत्संबंधाने उपलब्ध करुन घेता येतील. राज्यपातळीवर, केंद्र पातळीवर ते निश्चितपणे प्रभावी मांडणी करायचे त्यामुळे कैक रेंगाळणाऱ्या कल्पनांना चालना मिळाली, हे सत्य आहेच.
- मराठवाडा विकास महामंडळाच्या कामकाजातील त्यांचे असलेला योगदान, मा.आ. रायभान जाधवांशी प्रादेशिक विकासा संदर्भातील मतैक्य, अरविंद मिर्रीकर व सुभाष सूर्यवंशी ज्यांच्यावर भुजंगराव कुलकर्णी सारख्या दृष्ट्या अशा प्रशासकाची नजर जो शैक्षणिक क्षेत्राविषयीही एक आगळा

- अधिकारीच मानला जायचा. **त्यांनी घडवलेल्या मनोभूमिकेत वावरणाऱ्या अधिकाऱ्यांसह गणेशरावांनी जे प्रकल्प मार्गी लावण्याचे प्रयत्न केले ते आजही विभागीय विकासात योगदान करीत आहेत.** आर्थिक मर्यादा असतानाही निर्णय राबवण्यातली धडाडी, अडचणीवर मात करु, अशा आत्मविश्वासाचे प्रतिक होती. काही पाऊले दमदार अशी उचलली गेली; पण काही प्रकल्प बदलत्या राजकीय प्रवाहांमुळे अर्धवटच असताना रखडलेल्या पण 'नियोजन' ह्या संदर्भात विचार करता त्या चुकीचे दिशेने टाकलेली पाऊले होते, असे टिकास्त्र त्यांच्या विरोधकांनीही कधी केले नाही.
- आ. रायभान जाधवांनी मराठवाडा विकाससंदर्भात जे जे म्हणून प्रकल्प प्रस्तावित केले. **तत्संबंधाने केंद्र शासनाकडून मंजुरी मिळवून देण्यात श्री बापूसाहेब कमालीची असे तत्परता दाखवत. शंकररावजीचा तर त्यांना नेहमीच पाठिंबा असे.**
- CIPET (Central Institute of Plastic Engg. Technology) हा प्रकल्प Indo German Tool Room हा प्रकल्प नव्यानव्या तंत्रप्रणाली मराठवाड्यात येत रहाव्यात, अशी आग्रही भूमिका घेणारा. एम.आय.डी.सी. तील खऱ्या अर्थाने 'Infrastructural Development' सुयोग्य हाताळले गेले. **त्यात गणेशरावाचे योगदान लक्षणीयच होते.** त्याकाळात मी माझ्या प्लास्टिकच्या उद्योगात असल्याने मला ह्या संदर्भात ते घेत असलेले श्रम त्याची अधिक जाणीव होती. लघुउद्योजकांना साथ देणे त्यात तर त्यांचा पुढाकार असायचा.
- **IGTR, CIPET, CEDT etc. असे प्रकल्प जे मराठवाडा विकास संदर्भात लक्षणीय टप्पे मानले जातात. त्यात गणेशरावजीचे योगदान कसे नाकारता येईल?**


MSME TECHNOLOGY CENTRE
INDO GERMAN TOOL ROOM, AURANGABAD
*(A Government of India Society, Ministry of MSME)*
AN ISO 9001:2015, ISO 14001:2015, ISO 45001:2018 & ISO 50001:2018
CERTIFIED TOOL ROOM & TRAINING CENTRE


## मा. बापूसाहेब एक निर्भीड, निर्भेळ, निर्मळ, सात्विक व्यक्तिमत्त्व

श्री. सुभाषराव सूर्यवंशी, हिंगोली / छत्रपती संभाजीनगर

इ.स. 1968-2020

**प्रसंग एक -**

- एम.डी.सी.चे महत्त्वाचे प्रकल्प इंडो जर्मन टोल रुम, सी.ई.डी.टी., एम.सी.ई.डी. हाजीरा, नांदेड-नागपूर गॅसपाईप लाईन सारख्यांना मा. बापूसाहेबांचा सक्रीय पाठींबा होता. दिल्लीला बहुतेक आम्ही बरोबर जात असू व मुक्कामही महाराष्ट्र सदनला असायचा. मा. श्री. शंकरराव चव्हाण साहेब केंद्रात अर्थमंत्री, नियोजन मंत्री असल्यामुळे दिल्लीत सर्व स्तरावर आम्हाला सहकार्य व पाठींबा असायचा. तेथे मी बघीतले मा. बापूसाहेबांचे सर्व राज्यातील तरुण नेत्यांशी अत्यंत स्नेहाचे संबंध होते. हे त्यांचा राजकीय मित्र परिवार बघून मलाही आश्चर्य वाटायचे. दिल्लीत बऱ्याच मंत्रालयात त्यांचे स्नेहाचे संबंध होते. सेक्रेटरी, जॉईंट सेक्रेटरी, हे त्यांना सन्मानाने वागवत. त्यांचा वैयक्तिक ओलाव्याच्या स्वभावामुळे जो त्यांना भेटेन त्याला मा. बापूसाहेब आपलेच वाटत. त्यांच्याशी मैत्री करणारे बरेच मित्र आले आणि दुरावले (अनेकांनी केसाने गळाही कापला); पण मा. बापूसाहेब त्यांच्याविषयी कधीही कटुता बाळगत नसत. त्यांना त्याबाबत खंतही वाटत नसे; पण एकदा त्यांचा दृष्टिकोन व विचार मित्राला समजला की, ते मित्र कधीही त्यांच्यापासून दुरावले नाही. त्यांच्याशी मैत्री निरपेक्ष व स्वच्छ व अहंकाररहीत असेल तर फारच उत्तम.




- मी ज्या ग्रुपमध्ये जाणार होतो त्या एजन्सीकडे जाऊन मी अमेरीकेला जाण्यासंबंधी बोललो. त्या मॅनेजरला फार आश्चर्य वाटले. तो म्हणाला ''ग्रुप के लोग दो महिने से तैयारी कर रहे है, आपका दो दिन मे यह कैसा होगा. कहाँ से आए हो?'', असे उपरोधक बोलले. जेव्हा दुसऱ्या दिवशी

- सर्व कागदपत्र दाखविले. त्यांना आश्चर्य वाटले व म्हणाले ''यह कैसा मुमकिन हो गया? आप कहाँ से आए हो?'' **थोडक्यात अशक्यप्राय बाब मा. बापूसाहेबांनी शक्य करुन दाखविली.**
- मा. बापूसाहेबांनी सांगितले, हे माझे मित्र एम.डी.सी. मध्ये अधिकारी आहेत. ते ग्रामीण भागातील असून इंजिनिअर आहेत. त्यांना आम्ही प्रकल्प अभ्यासासाठी शिकागोला पाठवत आहोत. परवा त्यांचे शिकागोला जाण्याचे विमान तिकीट बुक केले आहे. हे सांगितल्यावर श्री. कांगो साहेबांचा आवाज थोडा करडा झाला व जरा नाराजीच्या स्वरुपात मा. बापूसाहेबांना बोलले ''हे शक्य नाही, परदेश दौऱ्यासाठी मंत्रीमंडळाची परवानगी घ्यावी लागते. इतक्या लवकर शक्य नाही''. मा. बापूसाहेब शांतपणे बोलले. ह्यांना तर मी पाठविणारच. आपण मान्यता नाही दिली तरी आम्ही आमच्या खर्चाने पाठवू, असे बोलून सरळ केबीनमधून बाहेर आले. पुढे मी अमेरीकेला जाऊन आलो. चौकशी झाली अखेर **मा. मंत्री सुधाकरराव नाईक साहेबांनी कार्योत्तर मान्यता दिली व मला समजही दिली, की शासनाचे नियम या पुढे पाळत जा. श्री. कांगो साहेब म्हणाले, ''तुम्ही श्री गणेशरावांचे मित्र म्हणून वाचलात, नसता पूर्ण खर्च तुमच्याकडून वसूल केला गेला असता. प्रोटोकॉलप्रमाणे काम करायचे शिका.'' मी अमेरीकेला जाण्याच्या तयारीने मुंबईला आलो नव्हतो; पण सौ. संध्याताई वहिनी साहेबांनी काही गरम कपडे, बॅग व इतर सामान दसम्या सर्व तयारी करुन मला दिले. मी औरंगाबादला माझी पत्नी सौ. सिमा हिला ह्या बद्दल कल्पना दिली. तिला जास्त माहीत नव्हते. ती नेहमीप्रमाणे उद्या सकाळी येणार का? मी सांगितले, मी अमेरीकेला जात आहे, मग येईल. तिलाही फार आश्चर्य वाटले. असो.**

**प्रसंग दोन -**

- श्री गणेशराव दुधगावकर यांचा शब्द श्री शंकरराव चव्हाण अजिबात मोडत नव्हते. पहिल्याच मिनिटात डायरेक्ट श्री शंकरराव चव्हाण यांची भेट घेणाऱ्या मोजक्या लोकांपैकी एक म्हणजे बापूसाहेब दुधगावकर होते. जेव्हा बापूसाहेबांनी भाचे जावई व कार्यकर्ते श्री रामप्रसाद बोर्डीकर यांच्या मुंबई मार्केट कमिटी मध्ये संचालक म्हणून नेमणूकीसाठी श्री शंकरराव चव्हाण यांना विनंती केली तेव्हा श्री शंकरराव चव्हाण आणि बापूसाहेब अनेक तास बोलत होते. शंकरराव यांना बापूसाहेब म्हणाले की चांगला मेहनती कार्यकर्ता आहे कृपया रामप्रसाद बोर्डीकर यांना मुंबई मार्केट कमिटीवर संचालक म्हणून पाठवावे आणि शंकरराव म्हणत होते की ''अरे गणेश, तू का हट्ट करत आहेस? रामप्रसाद फक्त चौथी पास आहे त्यांना ते काम झेपणार नाही. कृपया हट्ट करु नको.'' पण श्री गणेशरावांनी स्वतःचे सर्वस्व पणाला लावून शेवटी श्री रामप्रसाद बोर्डीकर यांचे नॉमिनेशन मुंबई मार्केट कमिटीवर करुनच घेतले. आणि पुढे श्री रामप्रसाद बोर्डीकर यांनी जिंतूर तालुक्यातल्या अनेक गावातील लोकांना मार्केट कमिटी मध्ये नोकरी लावून दिली आणि सगळा महाराष्ट्रच जाणतो की बराच मोठा व्यवहार सुद्धा सांभाळला.

**प्रसंग तीन -**

- श्री रामप्रसाद यांना मुंबई मार्केट कमिटीचा मोठा व्याप कसा सांभाळावा हे शिकविण्यासाठी मला स्वतःला बापूसाहेब यांनी एक महिनाभर रामप्रसाद बोर्डीकर यांच्यासोबत पाठविले. मी तिथे महिनाभर बोर्डीकर साहेबांसोबत राहून त्यांना मुंबई मार्केट कमिटीचा व्याप कसा सांभाळावा याच्यासाठी मदत करीत होतो. शेवटी महिनाभरानंतर निघून येताना एक ठोकताळा मी श्री.बोर्डीकर यांना सांगितला की एखादा महत्वाचा विषय तुमच्याकडे आला की त्या फाईलवर ''पुट अप'' असे लिहायचे जेणेकरुन तो विषय मेन मीटिंगमध्ये येऊन मंजूर करुन घेता येईल, आणि जे काम शेतकऱ्यांच्या भल्याचे वाटत नाही त्या फाईलवर ''चर्चा करुन निर्णय घ्यावा'' असा शेरा लिहायचा.

  मग मी तिथून निघून आल्यानंतर पुन्हा एक महिना दोन महिन्यांनी बोर्डीकर यांची भेट झाली आणि मी त्यांना सहज विचारले कसं चाललंय एपीएमसी चं काम? त्यावर रामप्रसाद यांनी मजेशीर उत्तर दिले की ''एकदम छान चाललंय साहेब. सगळ्या फाईल पुट अप..!!'' आणि अशा पद्धतीने सगळा महाराष्ट्र जाणतो, की साहेबांनी मार्केट कमिटी छान व्यवहार करुन गाजविली.

**प्रसंग चार -**

- **बजाज कंपनी वाळूज एमआयडीसी मध्ये येण्याबाबतचा किस्सा.**
- श्री गणेशराव दुधगावकर यांना श्री रामराव आदिक मानसपुत्र समजायचे. त्या मंत्रिमंडळात एकदम प्रभावी मंत्री म्हणून श्री गणेशराव दुधगावकर कार्यरत होते. रामराव आदिक उपमुख्यमंत्री तसेच उद्योग मंत्री होते. बापूसाहेब यांनी रामराव आदीकांना मराठवाड्यात मोठा एंकर उद्योग आल्याशिवाय मराठवाड्यात औद्योगिक क्रांतीला सुरुवात होणार नाही असा हट्ट धरायला सुरुवात केली. सात फेब्रुवारी १९८३ च्या शपथविधीनंतर पुढच्या काही महिन्यातच आदिक साहेब, श्री बापूसाहेब दुधगावकर तसेच मराठवाडा डेवलपमेंट कार्पोरेशन (एम.डी.सी.) चेअरमन आमदार श्री रायभान जाधव यांनी बजाज ऑटो कंपनी वाळूज येथे येण्याबद्दल जोरदार हालचाली केल्या. बजाज या नावाजलेल्या कंपनीच्या भारत देशातल्या दुसऱ्या प्लांटचे भूमिपूजन वाळूज येथे १९ जानेवारी १९८४ रोजी पार पडले.

- जेव्हा बजाज कंपनी वाळूजला येणार असे ठरले तेव्हा मी स्वतः त्या टेबलवर होतो, ज्या टेबलवर बजाज कंपनीला वाळूज मधील जागा अलॉट करण्यात आली. कारण तेव्हा मी जस्ट एमडीसी मध्ये नोकरी करायला सुरुवात केली होती आणि एमडीसी चेअरमन हे श्री रायभान जाधव होते, ज्यांच्या मीटिंगमध्ये बजाज ऑटोला वाळूज येथील जागा अलॉट करण्यात आली.
- जरी बजाज ऑटो वाळूज येथे अँकर प्लांट होणार असे वाटले होते तरी शंभर कोटी गुंतवणूक असलेला कारखाना आज चाळीस वर्षानंतर देशाला दहा हजार कोटी जीएसटी मिळवून देऊ शकणाऱ्या औद्योगिक प्रगतीसाठी कारणीभूत ठरेल असं कोणालाच वाटलं नसेल. या प्रगतीचे सगळं वाळूज मध्ये झालेल्या औद्योगिक क्रांतीचं श्रेय या बजाज प्लांटला जाते. आज गर्व वाटतो की मराठवाड्यातील औद्योगिक क्रांतीची सुरुवात करणाऱ्या वाळुज एमआयडीसीचे कायापालट करणाऱ्या बजाज कारखान्याला तिथे आणण्यात बापूसाहेब दुधगावकर, श्री रामराव आदिक, श्री रायभान जाधव यांच्या मेहनतीचा साक्षीदार मी स्वतः राहिलो.

**प्रसंग पाच -**

- **इंडोजर्मन टुलरुम व सिईडीटी औरंगाबाद**
- **मराठवाड्यात फक्त कारखानदारी वाढून चालणार नाही, तर विविध प्रकल्पाला लागणारे कौशल्यपूर्ण मनुष्यबळ मराठवाड्यात तयार व्हावे व त्यास स्थानिक कारखान्यात सेवेची संधी मिळावी व रोजगार वाढावा, असा मा. बापूसाहेबांची व श्री. रायभानजी जाधव साहेबांचा आग्रह असे.** त्यावर सतत चर्चा करत. एम.डी.सी. ने नवे प्रकल्प सादर करावे. केंद्रशासनाची मंजुरीची जबाबदारी मा. बापूसाहेबांना सर्वस्वी घेतली होती. श्री. रायभानजी जाधव साहेबांविषयी मा. बापूसाहेबांना नितांत आदर होता. मा.श्री. रायभानजी जाधव साहेबांशी बुद्धिमत्ता, अभ्यासूवृत्ती व भविष्यातील विकासाचा वेध अशा बाबीमुळे मा. श्री. रायभानजी जाधव साहेबांनी जे जे प्रकल्प एम.डी.सी. तर्फे प्रस्तावित केले, त्या प्रकल्पांना केंद्र शासनाकडून मंजुरी मिळविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य मा.बापूसाहेबांनी केले.
- मा. बापूसाहेब स्वतः माझ्याबरोबर विविध केंद्रीय संबंधित मंत्रालयात येत होते. त्यांची विविध सचिवाशी जवळीक होती व सर्व सचिव मा. बापूसाहेबांच्या उमद्या स्वभावामुळे बिनदिक्कत सहकार्य करीत. कारण मा. बापूसाहेबांचा विभागाचा विकास सोडून इतर स्वार्थी हेतू नसल्यामुळे सर्व कार्य सुरळीत झाले. आमच्या सर्व प्रस्तावास मा. श्री. शंकररावजी चव्हाण साहेबांचा सतत आशीर्वाद असे. इंजिनिअरींग क्षेत्रातील इंडोजर्मन टुलरुम व इलेक्ट्रोनिक क्षेत्रातील सी.ई.डी.टी. **हे महाराष्ट्र नव्हे तर भारतातील मनुष्यबळे विकास प्रकल्पापैकी एक असे, अत्यंत महत्त्वपूर्ण प्रकल्प ठरले असून एम.डी.सी. चे मराठवाड्याच्या विकासात फार मोठे योगदान आहे.** हे प्रकल्प उभारणी प्रस्ताव समन्वय व कार्यान्वित करण्याचे भाग्य मला लागले. तत्कालीन एम.डी.सी. चे व्यवस्थापकीय संचालक श्री. अरविंद मिरीकर (आय.ए.एस.) साहेबाची यात फार महत्त्वपूर्ण भूमिका होती. **तसेच 15 वर्ष उशीरा का होईना** केंद्रीय प्रकल्प CIPET (Central Institute of Plastic Engineering Technology) हा सुध्दा **मा. बापूसाहेबांच्या प्रयत्नामुळे औरंगाबादला कार्यान्वित झाला. असे प्रकल्प आणताना मा. शंकरराव चव्हाण साहेबांचे अमूल्य सहकार्य मराठवाडा कदापीही विसरु शकणार नाही.**
- मा. श्री. शंकरराव चव्हाण साहेबांना आम्ही अशा नवनवीन कल्पना असलेल्या प्रकल्पा संदर्भात भेटत असू. जेव्हा इंडोजर्मन टुलरुम, CEDT प्रकल्पाची कल्पना मांडली त्यावेळेस मा. श्री चव्हाण साहेब, केंद्रीय अर्थमंत्री, नियोजन मंत्री होते व Planning Commission चे उपाध्यक्ष होते. **त्यांनी त्यांच्या पी.ए. ला बोलावून सांगितले,** ''हे आमच्या मराठवाड्यातील अधिकारी आहेत. त्यांना प्लॅनिंग कमिशनचे प्रकल्प ग्रंथालयाला भेट देण्याची व्यवस्था करा.'' मी आठ दिवस प्रोजेक्ट लायब्ररीत गेलो व अनेक प्रकल्प अहवाल चाळले. सिपेट, इंडोजर्मन टुलरुम इत्यादी प्रकल्पाची माहिती मिळाली. माझ्या शिकागो भेटीत या प्रकल्पाविषयी मला कल्पना होती.
- कुशल मनुष्यबळ विकास प्रकल्प हे मराठवाड्यासाठी अति आवश्यक होते. अखेर विकास म्हणजे, रस्ते, वीज, कारखाने इतर मूलभूत सोई हा विकास नव्हे तर ज्या लोकांसाठी जे आपण करतो त्यांचा विकास, त्यांचे दरडोई उत्पन्न वाढविणे, अशी विचारधारा घेऊन आम्ही नवनवीन प्रकल्प शोधत होतो. **तीन ते चार प्रकल्प मराठवाड्याच्या तरुणांसाठी सर्वांच्या सहकार्याने कार्यान्वित केले.**
  - 1) IGTR (INDO GERMAN TOOL ROOM),
  - 2) CEDT (CENTRAL FOR ELECTRONIC DESIGN AND TECHNOLOGY)
  - 3) CIPET (CENTRAL INSTITUTE OF PLASTIC ENGINEERING TECHNOLOGY)
  - 4) MCED (MAHARASHTRA CENTER FOR ENTREPRENEURSHIP DEVELOPMENT)

- हे सर्व प्रकल्प राज्य व केंद्र शासन यांच्या संयुक्तरित्या कार्यान्वित झाले. ह्या प्रकल्पाची मूळ कल्पना प्रोजेक्ट रिपोर्ट, मंजुरी ही सर्व कामे मराठवाडा विकास महामंडळाने केली. **मा. बापूसाहेब व मा.श्री. रायभानजी जाधव साहेब यांच्या सतत संयुक्त प्रयत्नाने हे मनुष्यबळ विकासाला चालना देणारे प्रकल्प सध्या औरंगाबादला स्थापित झाले असून आज दिमाखाने मराठवाडाच नव्हे तर महाराष्ट्राच्या विकासात मोलाची भर टाकत आहेत.**

**प्रसंग सहा -**

- मा. बापूसाहेब हे उच्च तंत्रशिक्षण मंत्री म्हणून स्व. वसंतदादा पाटील यांच्या मंत्रीमंडळात कार्यरत असताना इंजिनिअरींग कॉलेज खाजगी संस्थांना चालविण्यास परवानगी द्यावी, असा धोरणात्मक निर्णय झाला. मा. कमलकिशोर कदम, मा. श्री. वाय. पाटील, मा. श्री. विश्वनाथराव कऱ्हाड इत्यादी मंडळी मा. वसंतदादानीही या संदर्भात चर्चा करुन **त्यांना खाजगी इंजिनिअरींग कॉलेज चालविण्यास परवानगी दिली, हे सर्व प्रस्ताव मा. बापूसाहेब यांच्या सहभागाने मंत्रीमंडळाच्या मंजुरीसाठी जात असत व पुढे या सर्व संस्था नावारुपाला आल्या.**
- आम्हीही मा. बापूसाहेबांना परभणीसाठी इंजिनिअरींग कॉलेज घ्यावे, असा अनाहूत सल्ला दिला; पण बापूसाहेबांनी उच्च तांत्रिक शिक्षण ऐवजी आपण जनरल एज्युकेशमध्ये गुणवत्तापूर्वक काम करु. इंजिनिअरींग कॉलेज यासाठी गुंतवणूक मोठी असून आमच्या भागात तशी क्षमता कमी आहे. अर्थ व्यवहार फार मोठा असल्यामुळे बापूसाहेबांना ते योग्य वाटले नाही व रसही घेतला नाही.



- तेव्हा श्री. राजीवजी गांधी पंतप्रधान यांनी रुजविलेली Computer Revolution रोपटे भारतात मूळ धरु लागली. संगणक क्रांती ही तिसरी जागतिक क्रांती होती. **तेव्हा पंतप्रधान राजीव गांधी म्हणायचे** we missed two buses, but we should not miss third bus i.e. computer and electronics revolution या धोरणाशी सुसंगत Electronics Ministry ने बरेचसे कोर्सेस भारतात राबविण्यास सुरुवात केली होती. ती खरीच Blood less revolution होती. एक नवचैतन्य भारतात निर्माण झाले होते.
- श्री ओबेराय यांचा मी एम.जी.एम. औरंगाबादला कार्यक्रम घेतला. तेथील अद्यावत सुविधा पाहून त्यांना नवीन कोर्सेस देण्यास काही अडचण आली नाही; पण जेव्हा ते माझ्याबरोबर परभणीला ज्ञानोपासक शिक्षण मंडळात आले तर त्यांना आश्चर्य वाटले. ना इमारत ना विकसित परिसर सर्व क्लास साध्या टिनच्या खोल्यात चालत असत. बापूसाहेब यांचे नाव त्यांना माहीत असल्यामुळे ते साध्या ऑफीसमध्ये प्रथम आले. चर्चा झाली. नंतर त्यांना संगणक विभाग दाखविला. त्यांना फार अवघडल्यासारखे वाटू लागले; पण ते जेव्हा कंप्युटर लॅबमध्ये गेले तर दंगच राहिले. **टिनच्या रुममध्ये Latest Computer सुसज्य Computer Lab, तज्ज्ञ शिक्षक पाहून दंग झाले.**
- जेव्हा कंप्युटर विकासाचे वारे सर्व क्षेत्रात वाहत होते; पण मूलभूत सोईच्या अभावामुळे विकास होत नव्हता, त्या काळामध्ये मा. बापूसाहेबांच्या दुरदृष्टीमुळे शैक्षणिकदृष्ट्या अत्यंत मागासलेल्या परभणी जिल्ह्यात इवलेसे रोप मा. बापूसाहेबांनी लावले. जिल्ह्यातील सर्व सामान्य जनतेच्या आर्थिक परिस्थितीमुळे आपल्या पाल्यांना शहरामध्ये उच्च शिक्षणासाठी पाठवू शकत नव्हते, हे लक्षात घेऊनच मा. बापूसाहेबांनी ज्ञानोपासक शिक्षण मंडळाच्या माध्यमातून ज्ञानगंगेचा उगम सुरु केला. **प्रस्थापित प्रथेनुसार बापूसाहेबांचा ''अर्थकारण'' हा उद्देश नव्हता; पण त्याऐवजी ''ज्ञानकारण'' हा उद्देश होता. सामान्य कुटुंबातील गरीब व होतकरु विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्वक शिक्षण देण्याचे त्यांनी व्रत घेतले होते. ज्ञानोपासक शिक्षण मंडळाच्या इवल्याश्या रोपाचा आज मोठा वटवृक्ष तयार झालेला आहे.**

## कुटुंबवत्सल गणेशराव दुधगावकर

**श्री. राम निकम, सेलू (परभणी)**

- पुढे ते लॉ करण्याकरीता दहा-बारा पुतणे (लिंबाजीराव, अंबादासराव व साहेबजी या बंधुची काही मुलं-मुली), भाचे, भाच्या (बहीण रुक्मीणी बाई शेजुळ, सुर्यवंशी यांच्या लता व मिना या दोन मुली) घेऊन औरंगाबादला गेले. अर्थात सर्व मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी समर्थपणे सांभाळली. (सन 1979 मध्ये मिना रुक्मिणीबाई उत्तमराव शेजुळ यांचा विवाह रामप्रसाद वामनराव बोर्डीकर कदम यांच्या सोबत झाला).
- त्या काळात विद्यार्थी दशेतील बापूसाहेबांचे घर सर्व नातेवाईकांना व गावाकडील मंडळीना मोठे आश्रय स्थान होते. कोणाचा दवाखाना असो की

- कोणाचे सरकारी काम असो किंवा विद्यार्थ्यांची शैक्षणिक अडचण असो. स्वतः बापूसाहेब पदरमोड करुन त्यांचे काम करायचे. अर्थात घरचे प्रमुख म्हणून त्यांचे मोठे बंधु लिंबाजीराव दुधगावकर (बाप्पा) त्यांना, इतरांना मदत करायचे. मला चांगले आठवते आमच्या गावाकडील एका आजारी माणसाला बापूसाहेबांनी पंधरा दिवस समर्थ नगरमधून पायी चालत जाऊन घाटीत जेवणाचा डब्बा पाठवला, अशी त्यांची सेवाभावी वृत्ती. त्यांच्या या अशा अनेक गुणांमुळे माझ्यावर त्यांचा प्रभाव पडत गेला. मी नात्यापेक्षा त्यांचा मित्र म्हणून अधिक जवळ गेलो.

## मैत्र जीवांचे

**श्री. गणेश घांडगे, शिरपूर (धुळे)**

इ.स. 1973

- त्याच वर्षी मराठवाडा विद्यापीठाचा वर्धापण दिन औरंगाबादला साजरा झाला. विद्यापीठांतर्गत महाविद्यालयासाठी विविध स्पर्धा होत्या. त्या स्पर्धेत आमच्या कॉलेजनही भाग घेतलेला होता. यास्पर्धेत गायन व नाट्यस्पर्धेत कॉलेजने प्रथम क्रमांक पटकावला. मोठी ढाल व दहा हजार रुपयाचे प्रथम पारितोषिक महाविद्यालयाला मिळाले. कलावंत म्हणून आम्हाला व जी. एस. म्हणून बापूसाहेबांना खूप आनंद झाला. आम्हा सर्व कलावंतांना त्यांनी जंगी पार्टी दिली. अशी कौतुकांची थाप त्यांची सदैव पाठीवर असे.
- या संस्कारातूनच पुढे त्यांनी आपल्या कॉलेजच्या स्टाफमध्ये कलावंताना अग्रस्थान दिले. म्हणूनच प्रा. अशोक जोंधळे, प्रा. सुरेश सदावर्ते, प्रा. इंद्रजित भालेराव, नारायण बुलंगे इ. कलावंतांना सांभाळले, त्यांचा लाड पुरवला. त्यांच्या कलेला प्रोत्साहन दिले.
- बापूसाहेब अगोदरच एल.एल.बी. च्या अभ्यासासाठी औरंगाबादला गेले होते, **तिथेही फ.मुं. ला बापूसाहेबांचे पालकत्व लाभले.** आपल्याबरोबर इतरांनाही घेऊन चालणारे आपल्यापेक्षा जास्ती उंची देणारे बापूसाहेब म्हणूनच इतर राजकीय नेत्यांपेक्षा वेगळे वाटतात. आम्हाला तर जवळचे वाटतात कारण आम्ही त्यांचे मित्र आहोत, पण त्यांच्या संपर्कात येणाऱ्या अनोळखी असणाऱ्याला ते आपलेच वाटतात.
- आपल्या संस्थेमध्ये बापूसाहेबांनी सामान्य परिवारातील गुणवंतांना निवडून त्यांना समृद्ध केले. कॉलेजबरोबरच अनेक शाळा त्यांनी सुरु केल्या. आजही सर्व ठिकाणी ज्ञानयज्ञ सुरु आहे.
- शेतकऱ्यांसाठी त्यांनी खत कारखाना काढला; पण सुडबुद्धीचे राजकारण करणाऱ्यांमुळे तो त्यांना बंद करावा लागला. आपल्या कर्मभूमिच्या विस्तार करत ते कर्मयोगी बनले.
- उंच पदावर जावूनही ते मित्रांना विसरले नाहीत. माझ्या मुलीच्या लग्नाची पत्रिका मला त्यांच्या हाती देता आली नाही, कारण ते मुंबई मुक्कामी होते. त्यांच्या संपर्क कार्यालयात मी ती दिली. **वाटते कसचे येताहेत गणेशराव!** पण आश्चर्य गणेशराव व संध्याताई दोघंही उभयता वधूवरांना आशीर्वाद देण्यासाठी आले. वधूवरांना भेटले, आशीर्वाद दिला. **त्यावेळी कृतज्ञतेने माझे डोळे भरुन आले.**
- असाच पुढे आमच्या गावातील प्राथमिक आरोग्य केंद्र संदर्भात त्यांची मदत मोलाची ठरली. शेका पक्षाची जिल्हापरिषद असताना **पाथरगव्हाण बु.** येथे पी.एच.सी. मंजूर झाली. मान्यतेसाठी शासनाकडे प्रस्ताव पाठवण्यात आला; पण आमच्या तालुक्यातील वजनदार नेतृत्वाने प्रस्तावाला खोडाघालून पी.एच.सी. आपल्या गावी नेण्याचा प्रयत्न केले. **आमचाच बंधू पंडित घांडगे गणेशरावांचा पी.ए. होता.** शासन दरबारी काय चालले आहे, हे त्यांनी गावी सरपंचाला कळविले. सरपंच परभणीला आले. मी त्यांना सोबत घेऊन गणेशरावांकडे गेलो. काय घडलं ते सर्व त्यांना सांगितले. त्यांनी ग्रामपंचायतचा ठराव घेतला आणि पुढे म्हणाले, ''तुमचे गाव कसे इतर गावांच्या मध्यवर्ती आहे, असे शेजारील गावांचे ग्रामपंचायत ठराव घेऊन या.'' **मग गाववाल्यांनी नाथरा, बानेगाव, गोपेगोव, मरडसगाव, पाथरगव्हाण खुर्द, डोंगरगाव आणि वरखेड इ. गावांचे ठराव आणून दिले.**
- बापूसाहेबांनी आमची बाजू भक्कमपणे शासनदरबारी मांडली; पण उपयोग झाला नाही. त्यांच्या सल्ल्याने गावाने खंडपीठात याचिका दाखल केली. **निकाल गावाच्या बाजूने लागला आणि प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत उभी झाली. आज गावी गेल्यावर प्रा. आरोग्य केंद्र पाहिले की बापूसाहेबांची तीव्रतेने आठवण येते व ते माझे मित्र आहेत याचा अभिमान वाटतो.**
- माझ्या मुलीचा मुलगा प्रवीण बरकुले मॅट्रीक उत्तीर्ण झाल्यानंतर कॉलेजमध्ये त्याच्या प्रवेशासाठी ज्ञानोपासकला गेला. नंतर संध्याताईना फोन लावला. तेव्हा त्या म्हणाल्या, ''प्रवेश असा कॉलेजला येवून मिळत नसतो, तुमच्या मित्राचं कॉलेज आहे. घरी या आणि हक्काने प्रवेश मागा, तरच प्रवेश मिळेल.'' त्यावेळी त्यांनी घर परभणीत ठेवलं नव्हतं. दैठणा शिवारात गंगाखेड रस्त्यावर शेतात घर बांधलं होत. मी तिथे गेलो, ताईंनी फराळ-पाणी झाल्यानंतर पूर्ण घर, शेत दाखवलं, ते सर्व पाहून मला खूप आनंद झाला, त्यावेळी ताई म्हणाल्या, उद्या तुमच्या नातवाला

- ज्ञानसंपन्न असूनही आपल्या ज्ञानाचा, पदाचा, वेगळेपणाचा, श्रीमंतीचा त्यांच्यात लवलेसही आढळून येत नाही. त्यांची मुलं माझे विद्यार्थी होते, त्यांच्यातही असाच साधेपणा मी पाहिलेला आहे. आपण कोणी विशेष आहोत, असं त्यांनी कधी दाखवलं नाही.

## मनामनातले जनाजनातले बापूसाहेब !

डॉ. राजेश गायकवाड, उखळी जि. हिंगोली / अहिल्यानगर

- पुढे परभणीला आल्यावर त्यांनी फारशी वकिली न करता आधीच ज्येष्ठ बंधू लिंबाजीराव दुधगावकरांनी (बप्पा) मजबूत केलेला राजकीय पाया आणखी मजबूत करण्यास सुरुवात केली. ते परभणी जिल्हा युवक काँग्रेसचे अध्यक्ष झाले व पुढे ''मराठवाडा विकास आंदोलनात'' त्यांच्या इतर मित्रांबरोबर पडले. **या आंदोलनाचा एकदम भडका ऊडून एक विद्यार्थी वसमत येथील गोळीबारात मरण पावला.** याची नोंद घेऊन मुख्यमंत्र्यांनी मराठवाड्याच्या बऱ्याच प्रलंबित मागण्या मान्य केल्या. यातूनच मग अंबाजोगाई येथे मराठवाड्यातील दुसरे व एशियातील पहिले ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय जून 1975 ला सुरु झाले.


औरंगाबाद, गुरुवार दि. २८ मार्च १९७४

मराठवाडा

दहूर आवृत्ती औरंगाबाद, गुरुवार दि. २८ मार्च १९७४ पृष्ठे : ४ किंमत : १५ पैसे

सर्वश्रेष्ठ, लोकप्रिय.... मजूर छाप बिडी
निर्माता : किशन व्यंकय्या गोरंट्याल अँड कं. जालना

**वसमतनगर येथे गोळीबार : २ ठार १ जखमी**

**मुलाखतीस बोलावलेल्या शेकडो जणांचे इंटरव्हयूच न झाल्याने झालेली गडबड**

प्रमुख वसमतला दाखल झाले आहेत. सायंकाळी वसमतच्या पोलिस ठाण्यावर बरेच लोक जमले होते. गाव शांत आहे, उगाच जादा पोलिस आणून वातावरण तंग करू नका असे या लोकांचे म्हणणे होते.

(आमच्या प्रतिनिधीकडून फोनने) नांदेड, दि. २७ :-

वसमतनगर येथे आज दुपारी आनंदभवनजवळ पोलिसांनी केलेल्या गोळीबारात दोन जण ठार झाले तर एक इसम जखमी झाला. त्यापूर्वी चौक भागात पोलिसांनी लाठीमारही केला होता. पूर्णा पाटबंधारे प्रकल्प कार्यालयातर्फे आज वसमत येथे १२० जागांसाठी सुमारे दोन हजार जणांचे इंटरव्हयू व्हायचे होते, त्यातूनच गडबड झाली व पुढे गोळीबार झाला.

मरण पावलेले दोघेही जिंतूर तालुक्यातील आहेत. देवीदास मेहरबान राठोड हा पिंपळगाव काजळ येथील राहणारा आहे; तर रामा देवीचंद शिसोदे हा सोस जोगवाड्याचा रहिवासी आहे जखमी झालेला इसम वसमतचा राहणारा असून त्याचे नाव दिगंबर देवराव असे आहे.

**मूळ येथून**

पूर्णा पाटबंधारे प्रकल्प कार्यालयातर्फे कॅनॉल इन्स्पेक्टरच्या १२० जागा भरावयाच्या होत्या. त्या जागांसाठी कार्यालयाने १८१० जणांना मुलाखतीसाठी बोलविले होते. मुलाखतीसाठी कालपासूनच लोक वसमतला जमू लागले होते. मुलाखतींची वेळ आज सकाळी अकरा ही ठरली होती. त्या वेळी कार्यालयापाशी सुमारे दोन हजार इच्छुक जमलेले दिसत होते.

**शंभरांची आधीच निवड ?**

मुलाखती घेणारे कार्यकारी अभियंता गावाला गेले होते दुसरे प्रमुख अधिकारीही तेथे नव्हते त्यातच ऑफिसमधील कोणी तरी असे सांगितले की, कशाला गर्दी करता, शंभर जणांची निवड अगोदरच झाली आहे. त्यामुळे मुलाखतीसाठ आलेले इच्छुक चिडले. जागा भरल्या होत्या तर आम्हांला बोलावलेच कशासाठी, पैसे खर्च करायला लावले कशासाठी असा सवाल उमेदवार करू लागले. दरम्यान तेथे आलेल्या तहसीलदारास या लोकांनी घेराव केला.

**दगडफेक**

तहसीलदार तेथून निघून गेल्यानंतर जमाव अनावर झाला व काही जणांनी पाटबंधारे कार्यालयावर दगडफेक केली दुसरे काही जण कार्यालयात शिरले व त्यांनी तेथील फाईली इकडे तिकडे फेकल्या. तेथून तो संतप्त जमाव निघाला गावाकडे, मग रस्त्यावरच्या ट्रकवर दगड फेकले गेले दोन दुकानांवरही दगडफेक झाली. एका बसवरही दगडांचा मारा करण्यात आला हाच जमाव पोलिस स्टेशनच्या दिशेने पुढे सरकला व तेथेही एका बसवर दगडफेक केली गेली.

**प्रशंसनीय कार्य**

गावात घडलेल्या या प्रकाराची बातमी कोर्टात कळताच समाजवादी पक्षाचे सर्वश्री. रमेश अंबेकर, हरिकिशोर काबरा, पंडितराव देशमुख तसेच अन्विकर, शितळ घोडके, सारडा आदी कार्यकर्ते घटनास्थळी आले. त्यांनी लोकांना शांत केले सर्व जमाव बसस्टेशनकडे नेण्यात आला व तेथील पारावर सभा सुरू झाली.

**आणि गोळीबार**

दरम्यान सुमारे २५–३० जण गावात गेले. गावात काही दुकाने व हॉटेल्स उघडी होती. ती दुकाने बंद व्हावीत म्हणून त्या २५–३० जणांनी दुकानांवर दगडफेक केली. तेथेच (चौक भागात) पोलिसांनी लाठीमार केला. तेच २५–३० जण पुढे आनंदभवनजवळ आले. तेथेही दगडफेक झाली आणि पोलिसांनी गोळ्या चालविल्या. त्यात दोन जण ठार झाले तर मोचीराम करणारा सडकेवरील चांभार जखमी झाला.

**आमच्यावर गोळ्या झाडा**

या गोळीबारानंतर पोलिस पारावर गेले. तेथील जमावावर बंदुका रोखून असे सांगण्यात आले की, तावडतोब येथून निघून जा पारावर तेथे हजर असलेल्या नेत्यांनी सांगितले की, लोक शांततेने बसले आहेत. गोळ्या चालवायच्या असतील तर प्रथम आमच्यावर चालवा. या जबाबामुळे पोलिस तेथून मुकाटपणे परतले.

नांदेड येथील समाजवादी पक्षाचे प्रमुख कार्यकर्ते श्री. बियाणी हे स्वतः घटनास्थळी पाहणी करून आले. ते म्हणाले की, गावकऱ्यांकडून मला जी माहिती मिळाली त्याप्रमाणे कोठेही लुटालूट, जाळपोळ झालेली नाही. गोळीबार करण्यासारखे काहीही घडलेले नव्हते, जिंतूर तालुक्यातील शेकापचे नेते व आमदार श्री शेषराव देशमुख हेही वसमतला आले आहेत

गोळीबाराचे वृत्त कळताच परभणीचे कलेक्टर व जिल्हा पोलिस

- पुढे काँग्रेस पक्षाने बापूसाहेबांना ''वसमतनगर'' येथून विधानसभेचे तिकिट दिले व ते बहुमताने निवडूनही आले. नंतर मा. ना. वसंतदादा (मुख्यमंत्री) व मा. ना. रामरावजी आदिक (उपमुख्यमंत्री) यांच्या सरकारमध्ये ते राज्यमंत्री झाले.
- त्याचवेळी बप्पा को. ऑप. बँक चेअरमन, जि. प. सभापतीही होते. **मला वाटतं, करपरेकाठची ही बंधू जोडी एकमेव आहे ज्यांनी करपरेच्या पाण्याची ओळख परभणी जिल्हाच नव्हे तर सातासमुद्रापार (अरबी समुद्राला) मुंबईला करुन दिली.**
- आज हे ज्ञानोपासक कॉलेज स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड अंतर्गत पहिल्या तीन मध्ये आहे. या संस्थेच्या दैदिप्यमान वाटचालीत बापूसाहेबांबरोबर त्यांच्या धर्मपत्नी प्राचार्य डॉ.सौ. संध्याताई, ॲड. श्रीधरराव कदम व बप्पांचा वाटाही मोठा आहे. मला तर संध्याताई दिसल्या की वेणुताई चव्हाण यांची आठवण येते. असा लक्ष्मीनारायणाचा जोडा तोही राजकीय मंडळीत क्वचितच पहायला मिळेल. माझं भाग्य की मला कॉलेज जीवनापासूनच त्यांचा सहवास लाभला. पुढे तो आणखी वृध्दिंगत होत गेला. मागेपुढे तर नातेही झाले; पण त्यापुर्वीच आमचे उखळी, दुधगाव हे करपरेकाठचे नाते पाण्यासारखेच निर्मळ होते. मला ते चांगला माणूस म्हणुनही खूप आवडतात. असा शांत, संयमी, चारित्र्यवाण व प्रेमळ नेता परभणीच्या राजकारणात तरी दिसत नाही. त्यांनी बिब्याच्या झाडांनाही पाणी घातले. चंदनासारखेच ते झाड आहेत. कुऱ्हाडी मारणारांनाही सुगंध वाटत राहिले. त्यांच्या राजकीय, सामाजिक व शैक्षणिक कामाची नोंद तर येणाऱ्या कित्येक पिढ्या घेत राहतील.
- **''करपरेकाठी'' आता अशी कवचकुंडले 1000 वर्षतरी पुढे जन्मनार नाहीत. त्यांना उत्तम, आनंदी व दीर्घायुषी आयुष्य लाभो, हीच माझी ईश्वरचरणी प्रार्थना !**

## युवकांचे स्फूर्ती स्थान : कर्मयोगी बापूसाहेब

**श्री. भाऊसाहेब दिगंबरराव भोसले, पेठपिंपळगाव (परभणी)**

**इ.स. 1976-1980**

- युवा कार्यकर्त्यांमध्ये लहान मोठा किंवा मी इतरांपेक्षा वेगळा अशी धारणा नसल्याने वर्षभरातच जिल्हाभर युवा कार्यकर्त्यांची मोठी फळी निर्माण झाली. युवक काँग्रेसच्या जिल्हा कार्यकारणीची घोषणा झाली. परभणी जिल्हा युवक काँग्रेसचे अध्यक्ष ॲड. गणेशरावजी दुधगावकर, उपाध्यक्ष श्री. सुरेशरावजी वरपुडकर, संघटक वामनराव मोरे, कोषाध्यक्ष गोपाल तापडिया आणि सरचिटणीस म्हणून माझी नियुक्ती झाली. या निमित्ताने माझा दैनंदिन सहवास वाढला. त्यांच्या कार्यशैली, संघटन कौशल्य कार्यकर्त्यामध्ये समरस होण्याची प्रवृत्ती पाहून परभणी जिल्हामध्ये राजकीय क्षितीजावर उगवणारा एक प्रखर सितारा म्हणून बापूसाहेबांची प्रतिमा निर्माण झाली.
- लोकसभेच्या निवडणुकीचे रणशींग वाजले आणि महाराष्ट्रातून लोकसभेवर युवकांना प्रतिनिधित्व मिळावे, अशी मागणी म.प्र. युवक काँग्रेसने केली होती. यामध्ये परभणीचा देखील समावेश होता. **या प्रयत्नाला देखील यश आले आणि परभणी लोकसभेची उमेदवारी युवक काँग्रेसचे माध्यमातून ॲड. श्री गणेशरावजी दुधगावकर यांना आकाशवाणी व प्रसार माध्यमाच्या वतीने जाहीर झाली.** जिल्ह्यातील युवकांमध्ये एक प्रकारचे चैतन्य निर्माण झाले. परंतु फेरबदलामध्ये पुन्हा मा.खा.श्री. रामरावजी लोणीकर यांनाच उमेदवारी मिळाली. सदरचा आनंद हा अल्पकालीन ठरला. **परंतु एवढ्यावरच हार न पत्कारता श्री. रणजित देशमुख यांना सोबत घेऊन अ. भा. काँगेसच्या अध्यक्षा यांना मद्रास विमानतळावर भेटून नाराजी व्यक्त केली. श्रीमती इंदिराजी गांधीनी पाठीवर हात ठेवून ''काँग्रेस को जिताओ आपका भविष्य उज्ज्वल है'' एवढ्या आश्वासनावर लोकसभेच्या प्रचारात झोकून देऊन खा. रामरावजी लोणीकर यांना प्रचंड मतांनी विजयी केले.**




- महाराष्ट्रामध्ये सरकार स्थापनेमध्ये मुख्यमंत्री म्हणून मा.श्री. वसंतदादा पाटील आणि उपमुख्यमंत्री म्हणून मा.श्री. रामरावजी आदिक यांची निवड झाली. सुदैवाने परभणी जिल्ह्याला दोन राज्यमंत्री मिळाले. मा.ना. रावसाहेबजी जामकर आणि ॲडव्होकेट गणेशरावजी दुधगावकर यामध्ये बापूसाहेबांना रो. ह. योजना (स्वतंत्र कार्यभार), तंत्रशिक्षण राज्यमंत्री असे खाते मिळाले. दोन मंत्री असल्याने जिल्ह्यामध्ये विकास कामाचा झपाटा वाढला. वरचेवर कार्यकर्त्यांची फळी निर्माण झाली. परंतु मंत्रीपदाचा लाभसुध्दा पूर्ण वेळ घेता आला नाही. बॅ. रामरावजी आदिक साहेबांचे व्हनोअर विमान प्रकरण घडले आणि त्यांचे समर्थनार्थ बापूसाहेबांसहित चौदा मंत्र्यानी राजीनामा दिला. कार्यकर्त्यांची निराशा झाली; पण हार मानतील ते बापूसाहेब कसे? त्यांच्यावर तिळमात्रही फरक पडला नाही. सतत कार्यमग्न रहाण्याचा त्यांचा स्वभाव राहीला.

## सच्चेपणा आणि माणुसकीची निर्व्याज ओल: गणेशराव दुधगावकर

**प्रो.डॉ. ऋषीकेश कांबळे, छत्रपती संभाजीनगर**

**इ.स. 1974**

- ग्रामीण भागातील खेड्यापाड्यातून विविध जाती-जमाती, शेतकरी-शेतमजूर आणि कष्टकरी-श्रमजीवी वर्गातली मुलं-मुली उच्चशिक्षणासाठी प्रांगणात येऊन उभी राहिली. मराठवाडा प्रदेश हा 17 सप्टेंबर, 1948 ला निजाम राजवटीच्या मगरमिठीतून मुक्त झाला आणि महाराष्ट्र राज्यात विनाअट सामील झाला. परंतु या प्रदेशाला उपेक्षितच राहिला, ही समज यायला 1960 चं दशक यावं लागलं. तोपर्यंत उच्चशिक्षणाची पिढी तयार झालेली होती. **या पहिल्या पिढीनं मराठवाड्याच्या उपेक्षेचं गाऱ्हाणं मांडणं सुरु केलं. या गाऱ्हाण्यातून मराठवाडा विकासाचं एक जनव्यापी आंदोलन उभं राहिलं. त्याचं नेतृत्व या उच्चशिक्षित मुलांनी केलं होतं. त्यात एक स्वर होता, गणेशराव उपाख्य बापूसाहेब दुधगावकर यांचा.**
- ज्यांच्या राजकारणाला समाजकारणाची कडा असते ते मूल्यहीन राजकारण कधीच करीत नाहीत. बापूसाहेब दुधगावकर हे दुसऱ्या वर्गातले आहेत. त्यांचा गोतावळा लक्षात घेतला तर आपल्याला हे सहज लक्षात येतं. समाजातल्या खालच्या थरातले पण निर्धन असलेले सवंगडी ही बापूसाहेबांची रसदही आहे आणि ऊर्जा सुद्धा !
- **मराठीतील विख्यात आत्मकथनकार प्रा. सदानंद पुंडगे यांच्याशी बोलत होतो. ते गणेशराव उपाख्य बापूसाहेब दुधगावकरांविषयी अत्यंत श्रद्धेनं बोलत होते.** म्हणाले, ''बापूसाहेब आयुष्यात आले नसते तर मी प्राध्यापक कधीच झालो नसतो.'' आयुष्यभर गँगमनच राहिलो असतो. प्रा.

- पुंडगे यांच्या उद्‌गारावरुन बापूसाहेब दुधगावकर यांनी आपल्या आजूबाजूची माणसं अत्यंत सहजतेने सांभाळलेली आहेत. **या सांभाळाला ना जातीचा स्पर्श ना धर्माचा स्पर्श !!**
- त्या जागेसाठी मी माझ्या वर्गामित्रासाठी प्रयत्न करत होतो. माग काढत कविवर्य फ. मुं. शिंदे यांना गाठलं. मला हे माहिती होतं की, गणेशराव दुधगावकर आणि फ. मुं. शिंदे हे जिवलग, त्यामुळं फ. मुं. शिंदेंचा सांगावा गणेशराव नाकारणार नाहीत. या विश्वासापोटी फ. मुं. ना गाठलं. फ. मुं. त्यावेळी औरंगाबादेत नुतन कॉलनीत राहत. दरम्यान फ. मुं.च्या कवितेचा समीक्षक म्हणून मला ओळखले जाऊ लागले होते. अन्य एका मित्रासाठी गणेशरावांकरिता पत्र देण्याची मी विनंती केली. फ. मुं. म्हणाले, ‘‘अरे ऋषी, डॉ. एस.एस. भोसले यांच्या आग्रहामुळे तुझा वर्गमित्र इंद्रजित भालेरावासाठीचं पत्र मी मागल्याच आठवड्यात गणेशरावांकडे पोहोचती केलं आहे. इंद्रजित भालेराव यांच्या आयुष्याची रोजीरोटी ज्ञानोपासक महाविद्यालयात निश्चित झालेली होती, हे उघड झालेले होते. त्यामुळे अनाठायी प्रयत्न करण्यात अर्थ नव्हता.

## माझे हिरो !

**प्राचार्य डॉ. श्रीधर भोंबे, जिंतूर जि. परभणी**

**इ.स. 1974-2024**

- मी पहिल्या वेळेस बापूसाहेबांना ६ व्या वर्गात असताना जिंतूरला येलदरी कॉर्नरवर (आत्ताचा शिवाजी महाराजांचा पुतळा) 8-10 कार्यकर्त्यांसोबत पायी जाताना पाहिले. उंच, धिप्पाड, पांढरे शुभ्र कपडे, काळे कुरळे केस, मिशा व दाढी आणि ऐटबाज चालणे पाहून मला तर पिक्चरमधील हिरोसारखे वाटले. त्यांना पाहिलं की, पंजाबी गायक गुरुदास मान याची आठवण होते. दुसऱ्या वेळेस 1985 ला जिंतूरमध्ये निवडणूक लढवत असताना, बस स्टँडवर कार्यकर्त्यांसोबत प्रचार करताना पाहिले. गर्दितही अगदी ठळकपणे त्यांचे अस्तित्व जाणवत होते. पांढरे शुभ्र कपडे, गळ्यात पांढरा रुमाल, काळा चष्मा, पिळदार मिशा व दाढी... एकदम भारदस्त व्यक्तिमत्त्व.
- माझे वडील त्यांच्या कामानिमित्त बापूसाहेबांना भेटत असत तसेच जोडपरळीचे पाहुणे आले की, नवनवीन माहिती मिळत असे; पण प्रत्यक्ष बापूसाहेबांची भेट 1990 निवडणुकीत सेलूच्या रेस्ट हाऊसवर सदावर्ते सरांनी करुन दिली. माथल्याच्या गंगारामजी मामाचा मुलगा ही माझी ओळख. त्यावेळेसच्या पाथरी मतदार संघातून बापूसाहेब निवडणूक लढवत होते. निवडणूक काळात त्यांच्यासोबत होतो. त्यांनी सर्व मतदारसंघ पिंजून काढला. मी त्यांना कधी थकलेले पाहिले नाही. ते सतत उत्साही व कार्यमग्न असत. पाथरी विधानसभेचा निकाल विरोधात गेला... वाईट वाटत होते; पण बापूसाहेब एकदम सहज, शांत काहीच घडले नाही असे होते. ते स्वतःच कार्यकर्त्यांना धीर देत होते. पाथरीच्या रेस्टहाऊसला मतदानाची पूर्ण आकडेवारी घेऊन व कार्यकत्यांना समजावून सांगत धीर देऊन परभणीला रात्री आले. निकाल कळाल्यापासून ते परभणीला मिसरनगरला घरी येईपर्यंत मी सोबत होतो. या कालावधीत त्यांचं वागणं पाहून मला आयुष्याकडे बघण्याचा दृष्टिकोन सापडला.
- जिंतूरला आम्ही 1992 - 93 ला ‘शिवार साहित्य मंडळ’ स्थापन केले होते. याद्वारे जिंतूर शहरात विविध साहित्यिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत असे. रुपाली... बापूसाहेबांची जेष्ठ कन्या, जी नाट्यकलावंत होती, कविता करत असे, गायन करायची, हुबेहुब बापूसाहेबांसारखी दिसायची. तिचं अकाली जाणं सर्वांनाच धक्का देऊन गेलं. शिवारच्या वतीने तिच्या नावाने मराठी साहित्यात पुरस्कार सुरु करावा असे ठरले; पण त्यांची परवानगी मिळेल का ? हा सर्वात महत्त्वाचा प्रश्न होता. प्रा. गणेश आवटे, प्रा. विलास पाटील, प्रा. सदानंद पुंडगे, प्रा. दाभाडे, प्रा. उत्तम व संतोष जाधव, प्रा. विजय घोडके आम्ही चर्चा केली व बापूसाहेबांकडून मी परवानगी घ्यावी असे ठरले. भीतभीत त्यांच्याकडे रुपालीच्या नावाने पुरस्कार सुरु करण्याचा विषय काढला तर मला वरुन खालपर्यंत न्याहाळले... मी तर थंडगार पडलो होतो... ‘नको ! नाही !’ हे शब्द कानावर पडल्यावर भानावर आलो. बापूसाहेब काय म्हणाले हे सर्वांना सांगितलं... अन बैठकीत एक मार्ग शोधला. त्यांना प्रत्यक्ष परवानगीसाठी न बोलता फोनवर बोलायचे ! कारण प्रत्यक्ष बोलायची कोणाचीही हिम्मत नव्हती, अन् रागावले तर फक्त ऐकणाऱ्यासाठी (मलाच) माहीत बापूसाहेब काय म्हणाले ते. तब्बल दोन वर्षे अधूनमधून पुरस्कारासाठी त्यांना विचारत होतो. काहीतरी कारण सांगून ते टाळायचे; पण फोनवर संपर्क चालूच ठेवला व दोन वर्षानंतर परवानगी मिळाली. 2001 पासून ‘रुपाली दुधगावकर राष्ट्रीय पुरस्कार’ आजपर्यंत अतिशय चांगल्या प्रकारे दरवर्षी वितरीत होत आहे.



कै. रुपाली गणेशराव दुधगावकर
( श्री. गणेशराव दुधगावकर यांची कन्या )

## सावली देणारं झाड : ॲडव्होकेट गणेशराव दुधगावकर

**प्रो.डॉ. अशोक जोंधळे, परभणी**

**इ.स. 1976**

- मला एक प्रसंग आठवतो तो इथे नमूद करणे मला गरजेचे वाटते. गणेशरावजी दुधगावकर (बापूसाहेब) परभणी जिल्हा युवक काँग्रेसचे अध्यक्ष असताना हिंगोली येथे फार मोठा काँग्रेसचा मेळावा संपन्न झाला होता. हिंगोली त्यावेळी परभणी जिल्ह्याचा तालुका होता. मेळावा रामलिला मैदानावर पार पडला होता. मेळाव्याचे संयोजक काँग्रेसचे जेष्ठ कार्यकर्ते ओमप्रकाश देवडा होते व मेळाव्यास मा. मुख्यमंत्री श्री. शंकररावजी चव्हाण, मा.श्री. नानाभाऊ एंबडवार, केंद्रीय मंत्री श्री. वसंत साठे, मा. जाबुवंतराव धोटे, श्री. अरुण दिवेकर व महाराष्ट्रातील सर्व आमदार, खासदार व कार्यकर्ते या मेळाव्यास उपस्थित होते. एवढे भव्यदिव्य स्वरुप मेळाव्याचे होते. बापूसाहेब परभणीतच होते आणि शनिवार बाजारच्या बँकेच्या गेस्ट हाऊसमध्ये बसलो होतो.
- बापूसाहेब म्हणाले, ''आज हिंगोलीला सायंकाळी काँग्रेसचा मेळावा आहे, जाणं आवश्यक आहे.'' त्यांनी जीप काढली व सरळ हिंगोलीला निघाले. शेजारी मी बसलो होतो. बापूसाहेब स्वत: जीप चालवू लागले. जीपमध्ये आम्ही दोघेच होतो. सायंकाळी आम्ही हिंगोलीच्या रामलिला मैदानावर पोहचलो. पहातो तर काय भव्यदिव्य मंडप, लायटिंगने झगमगत होता. मंडपाच्याबाहेर शेकडो जीप, कार ओळीने लागल्या होत्या. बापूसाहेबांनी जीप पार्क केली. जीप कुठे उभी केली ती खूण मी लक्षात ठेवून मी त्यांच्यासोबत मंडपात गेलो. बापूसाहेब सरळ मंडपातील भव्य अश्या व्यासपीठावर गेले. नमस्कार करुन ते सर्वांशी बोलू लागले. मी व्यासपीठाखालून सर्व बघत होतो.
- स्टेजवरील सर्व मंत्री, आमदार बापूसाहेबांना बोलत होते. भाषणाचे सत्र संपले व व्यासपीठावरील सर्व नेते सरकारी डाक बंगल्यावर गेले. बापूसाहेबांनी जीप काढली व गेस्ट हाऊसवर आले. सर्व नेते आपआपल्या कक्षामध्ये बसले होते. बापूसाहेबांना बघताच ते उठून बापूसाहेबांशी बोलत होते. त्यांची आपसात चर्चा सुरु असताना मी गेस्ट हाऊसच्या व्हरांड्यात उभा होतो.
- तेवढ्यात एका कक्षामधून एक व्यक्ती एका चारचाकी गाडीजवळ उभी राहीली. इनशर्ट केलेली व्यक्ती होती. मी पण आमच्या जीपजवळ जाऊन उभा राहीलो. तेवढ्यात त्या व्यक्तीने मला बोलावले. मी जवळ जाताच ती व्यक्ती म्हणाली, ''ते आतमध्ये गेलेले व्यक्ती कोण आहेत ?'' मी म्हणालो, ''ते ॲड. गणेशराव दुधगावकर आहेत, परभणी युवक काँग्रेसचे अध्यक्ष.'' **ते म्हणाले ''त्यांचा संपर्क फारच दांडगा दिसतोय. सर्व मंत्री, आमदार, खासदार त्यांना आपुलकीने बोलताहेत. पूढे त्यांना राजकारणात खूप मोठी सुवर्णसंधी मिळेल, असं त्यांच्या स्वभावावरुन दिसतय.'' मी त्यांना दबकत परिचय विचारला. तसे ते म्हणाले, ''मी अरुण दिवेकर आहे. अकोला नगर पालिकेचा नगरसेवक''** तेवढ्यात बापूसाहेब बाहेर आले. आम्ही जीपमध्ये बसलो व परभणीकडे परतीचा प्रवास सुरु झाला.

## गणेशराव दुधगावकर

**कवी प्रा. केशव बा. वसेकर, परभणी**

**इ.स. 1977**

- राजकारण आणि साहित्य म्हणजे सावत्र भाऊ. एकमेकांना तुच्छ समजणारे. गणेशरावांनी हा समज खोटा ठरविला. विजय पिंपरीकर, अशोक जोंधळे, सुरेश सदावर्ते, अनिल काळे हे आणखी गणेशरावांच्या सहवासातील कलावंत त्यांच्या कला प्रेमाची पावती आहे. फ.मुं. शिंदे यांच्या शिक्षणात तर त्यांच्या मोलाचा वाटा आहे. गणेशरावांचे घराणे गर्भश्रीमंत म्हणता येईल असे. आमच्या पंचक्रोशित कदाचित येवढे श्रीमंत कोणी नसावे. धनाची श्रीमंती कामाची नसून मनाची श्रीमंती असावी लागते. ही मनाची श्रीमंती गणेशरावांच्या ठिकाणी आहे. याचा थोडा अनुभव मीही घेतला आहे.
- गणेशराव काँग्रेस पक्षाचे प्रलोद आणि नंतर तंत्र शिक्षणमंत्री झाले. या काळात त्यांनी जिंतूर येथे शासकीय तंत्रनिकेतन व कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय मंजूर करुन घेतले. (प्रथम हे महाविद्यालय वापटी ता.वसमतच्या बहिर्जी शिक्षण संस्थेस मंजूर करण्यात आले होते.) जिंतूरचे व गणेशरावांच्या परिचयाचे म्हणून मी व प्रा. दिगंबर ठोंबरे बहिर्जी महाविद्यालयात नोकरीस होतो. **महाविद्यालय मिळाल्यानंतर जिंतूर येथील कार्यकर्त्यांच्या चकरा वसमतला सुरु झाल्या. यात रामप्रसाद बोर्डीकर, रामकिशन थिटे यांची नावे आठवतात. तांत्रिक बाबींची पूर्तता करणे आवश्यक होते.** संस्थेचे कार्यालयही महाविद्यालयातच होते. कर्मचारी व सर्व संस्थाचालक परिचयाचे असल्यामुळे आम्हाला तपशील मिळत होते. गणेशराव एकदा संस्थेत आले तर सगळी संस्थाच आपल्या ताब्यात घेतील, अशी चर्चा आमच्या कानावर आली. येथील वृतांत सांगण्यासाठी मी व प्रा. ठोंबरे परभणीस आलो. गणेशरावांची भेट झाली नाही. वसमतची माहिती लिंबाजीरावांना सांगितली.

## आमच्या दादांची (गणेशरावजी दुधगावकर) यशाची उत्तुंग भरारी

**श्री. बालाजी माणिकराव पालमकर (पत्रकार), वसमत जि. हिंगोली**

**इ.स. 1980**


- दुधगावकर पूर्वी हिंगोली आणि परभणी जिल्हा एकत्र असताना परभणी जिल्ह्यावर लोकशाही पध्दतीने व सहकाऱ्यांच्या माध्यमातून अढळस्थान पटकाविणारे श्री दुधगावकर कुटुंबीय त्यावेळी प्रामुख्याने ओळखल्या जात होते.
- मा. आ. मुंजाजीराव जाधव, ॲड. भोसले, ॲड. डहाळे, ॲड. सिकंदर आलम यासारखी विधिज्ञ मंडळी याचप्रमाणे श्री. बाबुराव भालेराव, श्री. नागोरावजी कातोरे आणि विद्यमान आमदार श्री. राजु नवघरे यांचे आजोबा श्री गोपाळराव नवघरे ही मंडळी प्रामुख्याने काँग्रेसच्या प्रचारात अग्रेसर राहत होती. त्यांच्या अथक प्रयत्नामुळे श्री. गणेशराव दुधगावकर हे वसमत विधानसभा मतदारसंघातून विजयी झाले. या दरम्यानच्या काळात पुर्णा स. सा. कारखान्याच्या माध्यमातून कै. उध्दवराव गरुड चेअरमन असताना त्यांच्याद्वारे शेतकऱ्यांचा विकास साधण्याचा प्रयत्न केला. दरम्यान त्यांना मंत्रीमंडळात प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली. राज्यमंत्री म्हणून त्यांनी काम केले. त्यांच्या उत्कृष्ट कार्यामुळे तालुक्यातील शेतकरी जनतेला दिलासा मिळाला. गाव तेथे रस्ता, पुर्णा एरिगेशन, पाण्याचा प्रश्न शेतीसाठी सिंचनाचा प्रश्न यासारख्या बाबींना अग्रक्रमांक देऊन त्या दूर करण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

## मराठवाड्याचे झुंजार नेते - मा. गणेशराव दुधगावकर

**श्री. के.ई. हरिदास, छत्रपती संभाजीनगर**

**इ.स. 1983**

- माझा मूळ पिंड समाजवादी व समतावादी असल्यामुळे राजकीय पक्षांच्या नेतृत्वासोबत अंतर ठेवूनच राहत असे. तरीही गणेशरावांसारखे युवक नेते व कार्यकर्ते यांच्याशी मैत्रीसंबंध टिकून राहिले. मराठवाडा विकास आंदोलनामुळे मराठवाड्याला मुख्यमंत्रीपद मिळाले. तसेच परभणी येथे कृषी विद्यापीठ स्थापन झाले. त्याशिवाय काही सहकारी साखर कारखाने व सुतगिरण्या पदरात पडल्या. त्यामुळे मला मराठवाड्यातील कृषी उद्योगाला चालना देण्यासाठी परभणी, जालना, औरंगाबाद, नांदेड व लातूर येथे जिल्हा उपनिबंधक पदावर कार्यरत राहून मराठवाड्यातील नेते व कार्यकर्ते यांच्या सहकार्याने मनासारखे विकासकाम करता आले. मा. गणेशराव यांचे उल्लेखनीय सहकार्य लागल्यामुळे परभणी जिल्ह्यातील साखर कारखाने, जिल्हा बँक, बाजार समित्या, पणन संस्था यांच्या प्रगतीसाठी प्रयत्नशील राहता आले. गणेशरावची सडपातळ उंच शरिरयष्टी, टोकदार मिशा व बुल्गानिन टाईप दाढीमुळे त्यांचे व्यक्तिमत्त्वाचा ठसा मनावर कायमचा उमटला आहे.



मराठवाडा

# परभणी जिल्हा बँकेतील वाद पुन्हा न्यायालयात

परभणी, दि. १ (म. वा.) – परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अध्यक्षपदावर ताबा मिळविण्यासाठी संचालकांच्या दोन गटांत रस्सीखेच चालू आहे.

उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालय यांच्या निर्णयांचे सोयी-प्रमाणे अर्थ लावण्याचे काम विद्यमान अध्यक्ष श्री. लिंबाजीराव दुधगावकर व त्यांचे प्रतिस्पर्धी आणि काही दिवसांपूर्वीच अध्यक्षपदावरून उचल-बांगडी झालेले श्री. बाबूराव गोरेगाव-कर हे करीत आहेत.

पूर्वी श्री. सुंदरलाल सावजी हे जवळजवळ बारा वर्षे बँकेचे अध्यक्ष होते. सहकारखात्याच्या नियमां-नुसार श्री. सावजी हे जास्त काळ अध्यक्षपदी असल्याने त्यांचे पद गेले तेव्हा १९७१ साली श्री. लिंबाजीराव दुधगावकर हे अध्यक्ष झाले. १९७१ ते ७७ पर्यंत दुधगावकर अध्यक्षपदी कायम राहिले. सहा वर्षा-पेक्षा अधिक काळ अध्यक्षपदी राहता येणार नाही. या सहकार कायद्याचा फटका त्यांना स्वतःलाच बसण्याची वेळ आली तेव्हा १९७७ मध्ये त्यांनी बॅन्केच्या वतीने या कायद्याविरुद्ध उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. कारण महाराष्ट्र शासनाच्या सहकारखात्याने या कायद्यान्वयें त्यांना अध्यक्षपदासाठी खास अपात्र ठरविले होते. त्या संबंधात दुधगावकरांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करून तात्पुरती स्थगिती मिळविली आणि १९८१ पर्यंत अध्यक्ष-पद टिकविले. ही याचिका तोपर्यंत सुनावणीस आलीच नाही. तेवढ्या आधारावर दुधगावकरांनी ७१ ते ८१ ही दहा–अकरा वर्षे अध्यक्षपद भोगले. १९८१ मध्ये श्री. बाबूराव गोरेगाव-कर हे बँकेचे अध्यक्ष म्हणून निवडणु-कीत निवडून आले. श्री. गोरेगावकर हे ऑगस्ट ८१ ते २७ सप्टेंबर ८३ पर्यंत अध्यक्षपदी राहिले. परंतु जिल्हा स्तरावरील एकापेक्षा अधिक संस्थांवर श्री. गोरेगावकर हे अध्यक्ष असल्यामुळे त्यांनी ९० दिवसांच्या आत बाकी पदांचा राजीनामा देणे जरूर होते. पण ते झाले नाही म्हणून जिल्हा उपनिबंधकांनी त्यांना बँकेच्या वा अन्य कुणाही सहकारी संस्थेच्या अध्यक्षपदावर राहता येणार नाही असा आदेश काढून २७ सप्टेंबरला श्री. गोरेगावकर व बॅन्केचे उपाध्यक्ष श्री. स. गो. नखाते यांना पदावरून कमी केले. दरम्यान दुधगावकरांनी मे १९८१ मध्ये उच्च न्यायालयात दुसऱ्यांदा बँकेच्या वतीने स्वतःच्या अध्यक्षपदावरील हक्कासाठी याचिका दाखल केली.

या दुसऱ्या याचिकेचा निकाल २४ जानेवारी ८४ रोजी उच्च न्याया-लयाच्या औरंगाबाद येथील न्याय-पीठाने न्या. श्री. एस. जे. देशपांडे व न्या. श्री. जी. एम. खांडेकर यांनी दिला. त्यांनी याचिका फेटाळली आणि सहा वर्षापेक्षा अधिक काळ श्री. दुधगावकरांना अध्यक्ष-पदी राहता येणार नाही, असा निर्णय दिला आहे.

यासंबंधात श्री. दुधगावकर यांचे म्हणणे असे की, शासनाने आपल्याला सहकारखात्याच्या कायद्यानुसार १९७७ मध्येच अपात्र ठरविले होते. त्या वेळी केलेल्या याचिकेचा निकाल आता २४ जानेवारी १९८४ रोजी लागला म्हणजे आपला अपात्रतेचा काळ १९७७ ते १९८० हा ठरतो व १९८० नतर पुन्हा नव्याने निवडणुका झाल्यास आपण निवडणुकीसाठी पात्र ठरू शकतो. जिल्हा उपनिबंधकांच्या आदेशानुसार सप्टेंबर १९८३ मध्ये अध्यक्ष श्री. गोरेंगावकर व उपाध्यक्ष श्री. नखाते पदावरून कमी झाल्यामुळे २१ नोव्हेंबर ८३ ला पुन्हा निवडणुका घेण्यात आल्या व आपण नव्याने अध्यक्ष बनलो. आता नवीन कायद्या-नुसार दहा वर्षांपर्यंत या पदावर राहण्यास पात्र आहोत.

याच संदर्भात हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेले असता सर्वोच्च न्यायालयाने ३१ ऑक्टोबर १९८३ ला 'जैसे थे' असा निकाल दिला. परंतु ऑक्टोबर ८३ ला अध्यक्ष अथवा उपाध्यक्षपद रिकामेच होते. तेव्हा या निकालांना आपल्या २१ नोव्हेंबर ८३ च्या निवडणुकीच्या वेळी काहीच परिणाम होत नाही, असा श्री. दुधगावकरांचा दावा असून त्याविरुद्ध आता गोरेगावकरांनी पुन्हा उच्च-न्यायालयाकड धाव घेतल्याचे कळते. एकंदरीत या पदासाठी चांगलीच 'कायदेशीर लढाई' चालू आहे.

- **मा. गणेशरावांचे जेष्ठ बंधू लिंबाजीराव** हे जिल्हा परिषद अध्यक्ष असताना अनेकवेळा बैठकीनिमित्त त्यांची भेट होत असे. त्यांच्या दिलदार स्वभावामुळे आमची घनिष्ठ मैत्री झाली. त्यांचे साहित्य वाचन उल्लेखनीय होते. त्यांची विनोदबुद्धी व हजरजबाबीपणा या सद्गुणांमुळे त्यांचा श्रोत्यांवर प्रभाव पडत असे. त्यांच्या निवासस्थानी आम्ही मित्रमंडळी अनेक मैफिलीत रममाण होत असू. त्या काळात गणेशराव राज्यमंत्रीपद बाजुला ठेवून रसिक, श्रोत्याप्रमाणे सहभागी होत असत.
- **त्यांच्यासोबतचे कार्यकर्ते सुरेश वरपुडकर व बोर्डीकर हे सहकार क्षेत्रात पदाधिकारी होते.** त्यांना संपूर्ण सहकार्य केल्यामुळे त्यांची सुद्धा जवळीक निर्माण झाली व नंतरच्या काळात ते सुद्धा

- राजकीय नेते व काही मंत्री झाले. तरीही त्यांनी मैत्री संबंध कायम ठेवून मला आदराने वागविले !
- **मध्यंतरी एका उल्लेखनीय घटनेमुळे थोडा फार गोंधळ व गैरसमज झाला होता.** एका विधानसभा प्रश्नाच्या अनुषंगाने त्या काळच्या दोन बलाढ्य नेत्यांना त्यांच्या कायदेशीर दोषामुळे चेअरमन पदांवरुन निष्प्रभावित करणे भाग पडले होते. जिल्हा मध्यवर्ती बँक व एका साखर कारखान्याचे चेअरमन पदावरील नेत्यांना काढण्यामागे कदाचित ना. गणेशरावांचाच हात असू शकतो, अशी चर्चा व बातम्या सुरु झाल्या. त्याबद्दल पालकमंत्र्यांनी नाराजी व्यक्त करुन मला खुलासा करण्यासाठी सूचित केल्याप्रमाणे अधिकृत खुलासा केल्यानंतरचे वातावरण निवळले, तोपर्यंत स्वत: गणेशरावांना सुद्धा त्याबाबत माहिती नसावी आणि त्यांनी सुद्धा माझ्याकडे विचारपूसही केली नाही. हा त्यांचा मनाचा मोठेपणा लक्षात घेऊन त्यांच्यासोबत निखळ मैत्री संबंध जपता आले. मा. गणेशरावांनी एका खत कारखान्याची उभारणी करुन सहकारी कृषी उद्योगाला चालना दिली. त्यांच्या या प्रकल्पाबाबत आम्ही इतर जिल्ह्यातील सहकार क्षेत्रातील कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. मात्र त्याप्रकारचा प्रयोग यशस्वी झाला नाही याची खंत वाटते.

## दिलदार... दिलखुलास... गणेशराव !

**श्री. सुरेश भटेवरा (पत्रकार), नाशिक**

इ.स. 1984

- तरुण वयातच विविध संस्थांवर काम करण्याची संधी गणेशरावांना मिळाली. परभणीचा जिल्हा खरेदी विक्री संघ, महाराष्ट्र राज्य मार्केटिंग फेडरेशन, राष्ट्रीय स्तरावरची इफको, कापूस उत्पादक शेतकऱ्यांची फेडरेशन, कृषक भारती सहकारी संस्था अशा विविध संस्थांमध्ये संचालक, चेअरमन अशी विविध पदे त्यांनी भूषवली. सर्वांनाच कल्पना आहे, की या साऱ्या संस्था शेती व शेतकऱ्यांशी संबंधित आहेत. गणेशरावांनी अनेक वर्षे या संस्थांमध्ये मनापासून काम केले. त्यांच्या कार्यक्षेत्राचा विस्तारही त्यामुळे परभणीबाहेर राज्याच्या कानाकोपऱ्यात झाला.
- शेतकऱ्यांचे उत्पादन वाढावे यासाठी बियाणे व रोपांचा विकास घडवण्यास त्यांनी चालना दिली. राष्ट्रीय स्तरावरच्या नाफेड सहकारी संस्थेचे संचालकपद भूषवतांना, गणेशरावांनी कृषी उत्पादनांचे प्रक्रिया उद्योग, कांद्याची निर्यात, तेलबियांवर प्रक्रिया करणाऱ्या ऑईल मिल्स, इत्यादींचे राष्ट्रीय धोरण ठरण्यात महत्त्वाचे योगदान दिले. **औरंगाबादचा भगिरथ सहकारी खत कारखाना, वेंगुर्ला येथील काजू प्रक्रिया उद्योग, चंद्रपूरचा सुगंधा प्रक्रिया उद्योग इत्यादींचा विकास व पुनरुज्जीवन घडवण्यास याच काळात त्यांनी चालना दिली.**

## विरोधातील आपला माणूस

**श्री. विजय जोशी (संपादक), परभणी**

इ.स. 1984

- एक प्रसंग मला आठवतो तो त्यांच्या मनाचा मोठेपणाचा. मी त्यावेळी परभणी नगर परिषदेचा सदस्य होतो. मी तर जनसंघाचा हे स्पष्टच होते. अर्थात काँग्रेसचा विरोध असणार हेही गृहीतच धरलेले असे. परभणी नगर परिषदेत त्यावेळी काँग्रेसची सत्ता होती. श्री गणेशरावही काँग्रेसचेच त्यामुळे त्यांची कामे बिनबोभाट आणि सहजपणे होणे अपेक्षितही होते; पण तसे न होता त्यांच्यातील स्वकीयांचाही त्यांना कधी कधी जो विरोध होत असे तसाच परभणी नगर परिषदेत त्यांना झाला.
- श्री गणेशराव दुधगावकर यांनी शैक्षणिक क्षेत्रातही काम उभे केलेले होते. परभणीसारख्या जिल्ह्याच्या ठिकाणी आणि एक उत्तम महाविद्यालय झाले पाहिजे, असे सारेच म्हणत; पण कोणी त्यासाठी पुढे येत नव्हते. जो तो शिवाजी महाविद्यालयात आपला प्रभाव अधिक कसा होईल ? याचाच विचार करीत आहे; पण त्यावेळी स्वतंत्रपणे ज्ञानोपासक महाविद्यालय परभणीत नव्याने उभे करण्याचे श्री गणेशरावांनी ठरवले. कामास सुरुवातही केली; पण महाविद्यालयासाठी परभणीत जागा हवी होती. त्यासाठीच म्हणून सध्या जेथे हे महाविद्यालय आहे ती जागा नगर परिषदेकडून मिळावी यासाठी त्यांनी शब्द टाकला-प्रयत्नही केले. त्यांच्याच गटाचे सदस्यही होते; **पण काही आप्तस्वकीयांचाही 'आंदरुन' विरोध होताच;** पण तरीही ही जागा देण्याचा विषय सभागृहात आणला गेला. थोडीफार खळखळ होऊन हा विषय बारीक होईल अशी अपेक्षा होतीच; पण ऐनवेळेस मात्र मनासारखे होत नाही. याचा काँग्रेसलाही अंदाज आला आणि हा विषय 'पेंडींग' ठेवण्यासाठी हालचाली सुरु झाल्या. आम्ही जनसंघाचे भाजपाचे म्हणून केवळ चारच सदस्य सभागृहात होतो. आमचा पाठिंबा तर असूच शकत नाही, हे साऱ्यांनी गृहितच धरलेले होते; पण शैक्षणिक क्षेत्रातील या अत्यंत चांगल्या कामाला काहींच्या विरोधामुळे दूर सारले जात आहे, असे आमच्या लक्षात आले. **परभणीच्या दृष्टीने हे काम झालेच पाहिजे. ते होणे आवश्यक असल्यामुळे आम्ही मात्र हा विषय आग्रहाने रेटून नेण्याचा विचार केला.** अर्थात मी शैक्षणिक क्षेत्रातील कार्यकर्ता असल्यामुळे

- मला तो विषय मांडावा लागला आणि एकतर या क्षेत्रातील अभ्यास, प्रभावी वक्तृत्व आणि **विरोधासाठी उभे केलेले मुद्दे याचे मी खंडन प्रभावीपणे केले. परिणामत: हा विषय त्याच बैठकीत पारित झाला.**
- नगरपरिषदेची बैठक संपली. आम्ही सारेजण आपापल्या कामी लागलो. सायंकाळी घरी आलो आणि रात्री ८-९ च्या सुमारास अचानकपणे श्री गणेशराव माझ्या घरी आले. मला काहीही माहिती नव्हते. एक काँग्रेसचा नेता आपल्याकडे अचानक आला याचे आश्चर्य वाटणे स्वाभाविक होते; पण येताच श्री गणेशरावांनी माझे मन:पूर्वक आभार मानले आणि केवळ त्यासाठी आलो, असे सांगितले आणि अशी मैत्री चालू ठेवू असा आशावादही व्यक्त केला. खरे तर गणेशरावांना स्वत: माझ्यासारख्याकडे येण्याची गरजही नव्हती. मुळात या विषयासंबंधात त्यांना मी मदत करावी, असे काही सुचवलेले नव्हते किंवा निरोपही नव्हता. काम तर न बोलताच आपोआपच झालेले होते. त्यामुळे त्यांनी स्वत: येऊन आभार व्यक्त करण्याची गरजच नव्हती. कारण तसे करण्याची त्यांची जी हतोटी होती-आहे, त्याचा परिणाम म्हणून त्यांचे कार्य सदैव विकासाभिमूख राहिलेले आहे, यात शंका नाही.

## प्रसन्न मुद्रेचे बापूसाहेब !

**श्री. शरद देऊळगावकर, परभणी / छत्रपती संभाजीनगर**

इ.स. 1988

- त्याचा प्रत्यय मला त्यांची मुलाखत घेताना आला. 'शब्द सेना' साप्ताहिकाच्या दिवाळी अंकासाठी (1988) त्यावेळी मी परभणी जिल्ह्यातील विद्यमान आमदारांच्या विकास कामाबाबत मुलाखती घ्यायचे ठरवले होते. त्यावेळी बापूसाहेबांची मुलाखत मी रेल्वे प्रवासात घेतली. 23 ऑक्टोबर 1988 रोजी पंचवटी एक्सप्रेसने प्रवास करताना इगतपुरी ते कल्याण या दरम्यान मी त्यांची मुलाखत घेतली. कोणतेही कागदपत्र समोर नसताना त्यांनी धडाधड आकडेवारीसह विकासाचा आराखडा आणि जिंतूर तालुक्यासंबंधीच्या योजना मांडल्या. गत 40 वर्षांची रखडलेली कामे आपण तीन वर्षाच्या कालावधीत कशी केली ते आकडेवारीसह सांगितले. गुजरातमधील गॅस प्रकल्प आणि खताचा कारखाना या आगामी योजनाही सांगितल्या.
- **परभणीचा विकास व्हावा तसा झाला नाही. यावर एका वाक्यात उत्तर दिले, ''जुन्या नेत्यांनी घटनात्मक जागा भरण्याचे काम केले.'' हे त्यांचे परखड भाष्य खूप काही सांगून जाते.**
- ही मुलाखत घेताना मराठवाड्याच्या विकासासंबंधी तसेच परभणी जिल्ह्याच्या गरजा आणि त्यासंबंधीच्या उपाय योजना याबाबत सविस्तर माहिती ज्या तळमळीने आणि अभ्यासुवृत्तीने मांडली, ती मी अद्याप विसरु शकलो नाही. परभणी जिल्ह्याचा विकासाचा आणि नेतृत्वाचा जगन्नाथाचा रथ ओढण्यास परभणी जनता का कमी पडते? हे कोडे अद्याप सुटलेले नाही. **मात्र मराठवाडा प्रश्नावर तळमळीने आणि अभ्यासुवृत्तीने विचार करणाऱ्या दुर्मिळ नेत्यापैकी बापूसाहेब एक आहेत हे नक्की !**

## दिलदार दोस्त...!

**बिरबल खान हकीम शेरदिल खान, पाथरी (परभणी)**

इ.स. 1989

- **त्याकाळी गणेशरावजींचे मोठे बंधू लिंबाजीराव दुधगावकर, रावसाहेब जामकर, बाबूराव गोरेगावकर, रामराव लोणीकर, कुपटेकर, स.गो. नखाते, श्री. चारठाणकर ही काँग्रेस कार्यकर्त्यांची मोठी फौज प्रचंड ताकदीने काम करत असे. या सर्वात गणेशराव आपली प्रतिमा जपून होते.** उच्चशिक्षित, राजबिंडे व्यक्तिमत्त्व, स्वभावात नरमाई आणि विषयां वरील पकड यामुळे ते प्रभावी ठरत. जिल्ह्यात शिक्षणाची मोठी गंगा त्यांनी आणली. एक प्रसंग मला आठवतो, मंत्री पदाची धुरा गणेशरावांच्या खांद्यावर आली त्यावेळी पाथरीमध्ये इंदिरा नगरच्या मस्जीद विकास कामासाठी त्यांनी मोठी मदत केली होती
- जात-धर्म-पक्ष या सर्वांच्या पुढे आमची मैत्री झालेली होती. निखळ, स्पष्ट वक्ता आणि कार्यकर्त्यांसाठी जिवाची धडपड करणारा असा नेता, अशी त्यांची छवी होती आणि आहे. सन 1980 आणि 1985 या दोन्ही विधानसभा त्यांनी वसमत आणि जिंतूर विधानसभा मतदार संघात गाजवल्या होत्या. यानंतर त्यांनी परभणी लोकसभा लढवली व जिंकूनही आले. काँग्रेस, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातून सहजरित्या प्रवास करत देशसेवा करत त्यांनी आपली छवी जोपासली आहे. जसे ''इत्र की मिट्टी में मिलकर ही महेक जाती नही, और फोड डाले तोभी हिरे की चमक जाती नहीं ।'' असा हा माझा मित्र आहे.

## निश्चयाचा महामेरु बहुत जनांचा आधारु श्रीमंत योगी

**श्री. पंडित मुंजाजी शिंदे, जिंतूर जि. परभणी** इ.स. 1992

- अध्यापकांची नियुक्ती करताना आपण कधीही नातेगोते, जिल्हा, प्रदेश, जात या बाबींचा विचार केला नाही. महाविद्यालयाची सुरुवात झाली त्यावेळी शासनाचे सर्व प्रवर्ग मिळून एकूण आरक्षण हे 34 टक्के होते. परंतु आपण नियुक्त केलेल्या अध्यापकांमध्ये राखीव जागांवर नियुक्त केलेल्या अध्यापकांचे प्रमाण हे 40 टक्केच्या वर होते म्हणूनच आपण समतेचे सैनिक ठरता. राजर्षी शाहू महाराजांच्या आरक्षण विषयक विचारांची आणि धोरणांची या निमित्ताने आठवण होते.

## तेथे कर माझे जुळती...!

**प्रा. डॉ. शिवाजी डोंगरे, लातुर**

- बापूसाहेबांमुळेच मला मा. शंकररावजी चव्हाण साहेब, मा. माधवरावजी शिंदे साहेब, मा. शरदचंद्रजी पवार साहेब, मा. गोविंदरावजी आदिक साहेब, मा. गोपीनाथरावजी मुंडे साहेब यासारख्या विभूतींना जवळून पाहता, अनुभवता व शिकता आले. बापूसाहेबांनी केलेल्या कार्यावरुन असंच वाटतं, की स्वतःसाठी जगण्यात जेवढा आनंद असतो त्यापेक्षा दुसऱ्यासाठी जगण्यात, दुसऱ्यासाठी आयुष्य झिजवण्यात मिळणारा आनंद शतपटीने अधिक असतो, हे सत्य बापूसाहेबांनी जीवनाच्या सुरुवातीतच ओळखलेले दिसते.

## दुधगावकर यांची संसद कामकाजातील भन्नाट युक्ती

**श्री. कमलेश गायकवाड (पत्रकार), नवी दिल्ली** इ.स. 2009

- शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी दुधगावकर यांना परभणी येथून २००९ मध्ये उमेदवारी दिली. ते ४७ % मत घेऊन विजयी झाले होते. परभणी शिवसेनेचा बालेकिल्ला आहे. याबरोबरच दुधगावकर यांचा व्यक्तिगत संपर्क यामुळे त्यांना चांगले मत मिळाले आणि ते विजयी झाले.

## गणेशराव दुधगावकर - एक अजातशत्रू व विकासाभिमुख नेतृत्व

**मा. आमदार श्री. शिवाजीराव चोथे, अंबड (जालना)** इ.स. 2009

- गणेश दुधगावकर एक बी.ए., एल.एल.बी. झालेले सुशिक्षित व्यक्तिमत्त्व. ग्रामीण कार्यकर्ता म्हणून काम करताना लोकसंघटन करुन मोठ्या प्रमाणात जनाधार मिळविला. या लोकसंघटनेच्या जोरावर त्यांना संसद सदस्य, महाराष्ट्र राज्य विधानसभेचे नेतृत्व करण्याची संधी मिळाली. त्यांनी या संधीचा उपयोग विविध क्षेत्रात करुन समाजाचा विश्वास संपादन केला.
- गणेश दुधगावकर यांनी खासदार आणि आमदार असलेल्या काळात शेती, शिक्षण, उद्योग आदी विषयावर संसदेत चर्चेत भाग घेऊन आपल्या मतदार संघाचे प्रश्न प्रामुख्याने मांडले. तसेच महाराष्ट्र राज्याच्या विधानसभेत शेतकऱ्यांचे कर्ज, बी-बीयाने, खतांचा पुरवठा आदी प्रश्नांवर लक्ष केंद्रीत करुन शेतकरी व शेतमजुरांचा विश्वास संपादन केला. हे करीत असताना तसेच राजकारण करीत असताना त्यांनी प्रस्थापित राजकारण्यांशी कधीही हात मिळवणी केली नाही. त्यांनी सर्व सामान्य सहकाऱ्यांना पुढे आणण्यास मदत करुन विविध पदावर नेतृत्व करण्याची संधी देवून त्यांचे कर्तृत्व फुलविले.
- राजकारण एका व्यापक अशा समाजकारणाचा भाग आहे. या सूत्राला आपल्या विचार आणि कार्यपद्धतीत गणेश दुधगावकर यांनी बांधून घेतले होते. राजकारणाच्या पर्यायाने सत्ताकारणाच्या माध्यमातून जिल्ह्यात नवसमाजनिर्मितीचे उद्दिष्ट साध्य होऊ शकते, यावर त्यांची कार्यशैली अधिष्ठीत होती. संभाषण शैलीतील मनमिळावू, सुसंस्कृतपणा ही त्यांची मोठी शक्ती आहे. या जोरावर कार्यकर्त्या मित्रांच्या संघटीत सहकार्याने ते परभणीचे नेतृत्व करु शकले. ग्रामीण भागात काम करताना त्यांनी मोठा लोकसंग्रह केला. समाजाचा विश्वास संपादन करुन अंगभूत समंजसपणाने लोकसंघटन केले आणि निवडणुकीच्या राजकारणात यशस्वी ठरले. या कामात त्यांच्या पत्नी डॉ. संध्या व मुलगा समीर यांची मोलाची साथ मिळाली.
- आपल्या राजकीय कारकीर्दीमध्ये आमदार, मंत्री, खासदार तसेच त्यांनी अनेक पदे उपभोगली.

- लोकसभा सदस्य असताना अन्न सुरक्षा विधेयक,
- भूसंपादन पुनर्वसन,
- महाराष्ट्रातील दुष्काळ,
- महाराष्ट्रातील धनगर समाजाचा अनुसूचित जातीत समावेश करण्यासाठी आदी प्रश्नांवर आवाज उठवून विविध प्रश्नांवर सरकारचे लक्ष वेधले.
- एन.एच. 222 चे चौपदरीकरण,
- केंद्रीय शिक्षणसंस्थेत आरक्षण दुरुस्ती विधेयक,
- रेल्वे अर्थसंकल्प,
- शेतकरी, शेतमजूर, दलित, वंचित घटकांचे आदी विषयांवरचे प्रश्न संसदेत मांडून जनतेचे प्रश्न सोडविण्याला हातभार लावले. संसदीय आयुधांचा वापर करुन त्यांनी लोकशाही मूल्य जपले.

- संसद सदस्य असताना जाणीवपूर्वक विकास प्रक्रिया कार्यान्वित होण्यासाठी दळणवळणावर भर दिला. पैठण, अंबड, घनसावंगी, पोखर्णी, नांदेड हा महाराष्ट्र महामार्ग व्हावा, यासाठी सातत्याने प्रयत्न केले. त्यांच्या प्रयत्नामुळेच हा महामार्ग पूर्णत्वास जात आहे. एवढेच नव्हे तर वाटुर फाटा ते परभणी रस्त्याचे चौपदरीकरण पूर्ण करण्यासाठी शासन स्तरावर पाठलाग केला. पैठण, उजवा कालवा तसेच जायकवाडी डावा कालव्याचा नवा पुनर्बांधणीसाठी प्रस्ताव तयार करावा, अशी मागणी लावून धरली. पैठण डावा कालवा प्रधानमंत्री सिंचन योजनेतून दुरुस्तीसाठी प्रयत्न केले. परभणी, जालना लोकसभा मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व करत असताना त्यांनी खासदार निधीमध्ये कधीही परभणी आणि जालन्यामध्ये दुजाभाव दाखविला नाही. जो खासदार निधी असतो तो जालना लोकसभा मतदार संघातील घनसावंगी व परतुर या विधानसभा मतदार संघामध्ये त्यांनी भरपूर प्रमाणात निधी देऊन त्याची माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहचविली, असे म्हटले तर वावगे ठरवू नये.


रविवार दि. २६ फेब्रुवारी १९८४

मराठवाडा

संस्थापक : कै. आ. कृ. वाघमारे

वर्ष ३७ अंक १९१ औरंगाबाद, रविवार दि. २६ फेब्रुवारी १९८४ पृष्ठ ६+८ किंमत ६० पैसे शहर आवृत्ती

वंदना क्लॉथ स्टोअर्स, सुभाष रोड, जालना

# मनमाड-औरंगाबाद रेल्वे मार्गासाठी अवघे चार क

## रेल्वेचे साहित्य जुनाट व अगदी मोडकळीस आलेले!

नवी दिल्ली, दि. २५ (प्रतिनिधी) रेल्वेकडे असलेले साहित्य जुनाट आणि मोडकळीस आले आहे. या साहित्याचे आयुष्य केव्हाच संपलेले आहे. पण यासाठी रेल्वेकडे पैसा आणि आवश्यक अधिकार नसल्याने रेल्वेखाते प्रवाशांना पूर्ण सुरक्षा देऊ शकत नाही, अशी स्पष्ट कबुली रेल्वेमंत्री श्री. गनीखान चौधरी यांनी दिली.

## शिख अतिरेक्यांची टोळी पकडली

## ते पाच अकाली नेते परतले

## कल्पनाशून्य अर्थसंकल्प —दंडवते

## मराठवाड्याच्या जखमेवर मीठ चोळण्याचाच प्रकार

## आदिलाबाद-पिंपळखुटीसाठी ३कोटी८८लाख

## दृष्टिक्षेपात अर्थसंकल्प
( आकडे कोटी रुपयांत )

| | १९८२–८३ प्रत्यक्ष | १९८३–८४ अदाजित | १९८३–८४ सुधारित अदाज | १९८४–८५ अर्थसंकल्पीय अदाज |
|---|---|---|---|---|
| (अ) एकूण वाहतुक उत्पन्न | ४३७६–०० | ५१५४–६८ | ४९९८–०० | ५४५७–०० |
| (ब) सर्वसाधारण कामकाज खर्च | ३१७९–३५ | ३४८८–२७ | ३६७६–०० | ४०११–०० |

## महागाई भत्ता : केन्द्राचा लवकरच निर्णय

## रेल्वे अर्थसंकल्पावर संतप्त प्रति मंत्र्यांना घेराव घालणार

- **रेल्वे बजेटमध्ये मराठवाड्यावर नेहमी दुजाभाव होत आलेला आहे. म्हणून पश्चिम महाराष्ट्र व विदर्भाप्रमाणे मराठवाड्यात देखील रेल्वेचे जाळे विस्तारीत झाल्याशिवाय विकास होणार नाही, ही दृष्टी बाळगून त्यांनी मुदखेड - परभणी तसेच परभणी - मनमाड या मार्गाचे दुहेरीकरण व्हावे, यासाठी प्रयत्न केले.** जालना - खामगाव रेल्वे मार्गाचे सर्वेक्षण पुन्हा करण्यात यावे, अशी मागणी संसदेत सातत्याने लावून धरली. अलीकडेच त्याचे सर्वेक्षण करण्यात आले आहे. जालना - नगरसोल डेमो एक्सप्रेससाठी देखील त्यांनी प्रयत्न केले. तसेच विविध विकासाच्या प्रश्नांवर निधी मंजूर करण्यास शासनाला भाग पाडले. त्यामुळे त्यांच्या कार्यकाळात जिल्ह्याच्या चौफेर विकासाला हातभार लागला. लोवर दुधना प्रकल्प ए.आय.बी.पी. मध्ये समाविष्ठ करण्यासाठी सातत्याने धरपड केली. त्यामुळेच मागील कित्येक वर्षापासून रखडलेला हा प्रकल्प वेगाने पूर्णत्वाकडे गेला. त्यामुळे मंठा आणि परतुर येथील पाणी पुरवठा योजना पूर्ण होण्यासाठी हातभार लागला.
- सामाजिक समता, आर्थिक विषमतेला विरोध, अस्पृश्यता, जातीभेदाला विरोध, साहित्य, शिक्षण, शेती, सहकार, पर्यायाने नवसमाज उभारण्याचा त्यांचा ध्यास दिसून आला. बहुजन समाजात शिक्षणाचा प्रसार व्हावा त्यांची आर्थिक वृद्धी व्हावी तसेच शिक्षणाच्या माध्यमातून होणारी प्रगती स्थायी आणि प्रगल्भ असते यासाठी शिक्षणाच्या संधी निर्माण करण्यावर लक्ष केंद्रीत करुन ज्ञानोपासक शिक्षण मंडळ परभणी या संस्थेची स्थापना करुन समाजात शिक्षणाचा प्रचार व्हावा, त्याची आर्थिक उन्नती व्हावी यासाठी प्रयत्न केले. शिवाय मॉडेल कॉलेज आणि

- केंद्रीय विद्यालये जिल्ह्यात सुरु करण्यासाठी प्रयत्न केले. **त्यामुळेच जालना जिल्ह्यात घनसावंगी येथे मॉडेल कॉलेज स्थापन झाले. केंद्रीय विद्यालय देखील सुरु करण्याची प्रक्रिया त्यांच्यामुळेच पुढे गेली. शैक्षणिक संस्थेला मदत करणे हा त्यांचा स्थायी भाव असल्याने शहागड येथे स्वामी रामानंद शिक्षण प्रसारक मंडळ संचलित प्रबोधनकार ठाकरे विद्यालयाची इमारत खासदार फंडातून उभी आहे. त्यातून त्यांचा शैक्षणिक जाणीवभाव दिसून येतो.**

## श्री गणेशाय नमः

**प्रा.डॉ. चारुदत्ता चौगुले, पुणे**

- एकदा पेपरमधून माझा एक राजकीय लेख छापून आला. नेहमीच येत. त्यातल्या एका लेखात मी गणेशराव याचं कार्य-माणूस म्हणून असणारं माणूसपण, सर्वसामान्यांबद्दल त्यांना असणारी तळमळ, तळागाळातल्या माणसाबद्दलची कवण, त्यांची कार्यकुशल कार्यक्षमता, पक्षाची ध्येयधोरण राबवण्यासाठीची धडपड - या सगळ्यावर प्रकाशझोत टाकणारे लेखन केले. अनेकांनी तो लेख आवडल्याचं आवर्जून मला कळवलं; पण काही राजकारणातल्या प्रतिस्पर्ध्यांना ते झोंबल. खरं तर तीही सगळी चांगली मंडळी पण हा लेख दुधगावकरांवर का लिहिला आमच्यावर का नाही? अशा आकसापोटी **त्यांनी माझ्यावर व दत्तावर खारखाण्याचा प्रकार केला.** जे माझ्या भावूक मनाला लागलं. तेव्हा दत्तासोबत संध्या वहिनींनी देखील माझी समजूत काढली. या अशा गोष्टीकडे लक्ष द्यायचं नाही व महत्त्व तर अजिबात द्यायचं नाही. वगैरे-वगैरे हे सगळं जेव्हा गणेशरावांना कळाले तेव्हा ते सहजगत्या बोलून गेले. यावरुन तुमचं लिखाण किती प्रभावी आहे, हा याचा पुरावा आहे. असा एक नवा दृष्टिकोण नवा विचार गणेशरावांनी दिला, तोही किती सहजगत्या.
- **एकदा तर गम्मतच झाली.** काँग्रेस महाराष्ट्र प्रदेशच्या पक्षाध्यक्षा म्हणून असलेल्या प्रतिभाताई या परभणी-लातूर-औरंगाबाद अशा मराठवाड्याच्या प्रचार दौऱ्यावर येणार म्हणून दुपारपासून खेडोपाडीची मंडळी जमलेली. परभणीला आम्ही वसमतमधून काही मंडळी संध्याकाळी त्या सभेसाठी परभणीत गेलो. आमची गाडी व त्यातून उतरलेली मी लोकांची अशी कल्पना झाली की प्रतिभाताई आल्या. त्यांनी घोषणा द्यायला व गर्दी करायला सुरुवात केली. कशीबशी गर्दीतून वाट काढत कार्यकर्ते मंडळी मला स्टेजवर घेऊन गेली. तेव्हा आजच्या सारखा मिडीया कार्यरत नसल्याने प्रतिभाताईना प्रत्यक्ष पहाणारे फारसे कोणी नव्हते. स्टेजवरच्या काही कार्यकर्त्यांना माहीत होते; पण तोपर्यंत प्रतिभाताईचा दौरा रद्द झाल्याची बातमी रेडिओतून एकदोघांना कळाली. पण ती लोकांना कशी सांगायची म्हणून त्यांनी सभा सुरु केली. उशीर झालेला आहे म्हणून हार तुऱ्यांचा कार्यक्रम रद्द केला व पक्षाच्या ध्येयधोरणाविषयी मॅडम सांगतील, असे म्हणून माझ्या हातात माईक दिला. मला कॉलेजमध्ये शिकवण्याची सवय असल्यामुळे मी आपल्या मतदार संघाची परिस्थिती कशी हवी ते व पक्षाचा कार्यक्रम व तो राबवण्याची पक्षाची व जनतेची साथ यावर कविता, कथामध्ये पेरत रंजक असे ललीत वैचारिक व्याख्यान दिले. माझे व्याख्यान संपताच टाळ्या वाजवत लोकं जावू लागले व बघता-बघता सभामंडप खाली झाला. मी म्हटलं अहो लोकांना थांबवा तर कार्यकर्ते म्हणाले जावू द्या मॅडम. ताई येणारच नाहीये आणि लोक तुम्हालाच ताई समजले आहेत. अरे देवा ! म्हणण्याची माझ्यावर वेळ आली. हा किस्सा जेव्हा, गणेशरावांच्या कानावर गेला तेव्हा ते हसून म्हणाले मग, तुमच्याकडे प्रतिभा आहे तर आमच्याकडे प्रतिभावंत आहेत. असे काही किस्से त्या काळात घडायचे व त्याचाही सगळेजण आनंद घ्यायचे राजकारणात असूनही माणसं मर्यादाशील होती. गणेशराव त्यांचं उदाहरण.
- परभणीत प्रा. हनुमानदास वर्मा, प्रा. शेख शफी, प्रा. फ. मुं. शिंदे, प्रा. सुरेश जाधव, प्रा. सुरेश सदावर्ते, प्रा. सोळुंके अशा सगळ्या सोबत कोणाच्याही घरी अगदी जमिनीवर बसून चहापान, हास्यविनोद, गीत संगीत, गप्पाटप्पा याचा मनमुराद आनंद घेणारे गणेशराव पाहिले आहेत, तर शेतीत हरवणारेही..! परभणीजवळ त्यांच्या शेतात अनेक प्रकार व जातीची झाडे लावून त्याविषयी भरभरुन बोलणारे, हे विशेष.

## छत्रपती शाहूंचे कृतिशील वारसदार - गणेशराव दुधगावकर

**प्रो. डॉ. शत्रुघ्न जाधव, हिंगोली**

- महापुरुषांचे खरे वारसदार होण्यासाठी त्यांच्या विचारांसह आचाराचीही गरज असते. बापूसाहेब दुधगावकर म्हणूनच महापुरुष असलेल्या राजर्षी शाहू महाराजांच्या विचार आणि कार्याचे खरेखुरे कृतिशील वारसदार ठरतात याचा उलगडा काही घटनांमधून निश्चित होतो.
- शेकडो एक्कर जमीन असलेल्या अतिश्रीमंत मराठा घराण्यात जन्मलेल्या बापूसाहेबांना पहिल्याच आमदारकीत राज्यमंत्रीपद मिळाले. श्रीमंती व

- राजेशाही थाट प्राप्त झालेल्या ॲड. गणेशरावांना ऐशआरामाची जिंदगी जगणे सहजच क्रमप्राप्त होते. त्यांच्या अशा जगण्यासाठी काही कोणाचा आक्षेप असण्याचाही प्रश्नच नव्हता. कारण तसे जगण्याचा त्यांना परिस्थितीजन्य अधिकार होताच. परंतु मंत्रीपद मिळताच लाल दिव्याच्या गाडीतून फिरताना त्यांना व्यक्तिगत थाटमाटाऐवजी खेड्यापाड्यातील गोरगरिबांच्या मुलांसाठी कॉलेज काढावे असे वाटले आणि परभणी व जिंतूर इथे कॉलेज काढून आजूबाजूच्या गावात शाळा काढल्या. आज त्या कॉलेज व शाळांचे भव्यदिव्य रुप पाहिल्यावर बापूसाहेबांच्या त्या काळातील वैचारिक दूरदृष्टीची कल्पना येते. **छत्रपती शाहूंच्या विचारांचा हा साक्षात कृतिशील आविष्कार आहे, हे वेगळे सांगण्याची गरज नाही.**

## बापूसाहेब, मराठवाड्याला आत्मभान देणारे नेतृत्व

**श्री. राहूल सोपानराव ढेरे (पत्रकार), परभणी**

- अशा जाणत्या नेत्यांमध्ये बापूसाहेब उपाख्य ॲड. गणेशरावजी दुधगावकर यांचे नाव अग्रक्रमाणे घ्यावे लागते. त्यांनी आपल्या आजपर्यंतची राजकीय कारकीर्द महाराष्ट्रासह मराठवाड्याला स्थैर्य देणारी आणि गतिमान करणारी ठरली आहे. त्यांना सदैव ध्यास लागलेला आहे एका बाजूला शेतीचा तर दुसऱ्या बाजूला ग्रामीण भागातील औद्योगिकीरणाचा, शैक्षणिक धोरणांचा आणि त्यानंतर ज्यांच्या हाताला काम नाही त्यांच्या हाताला काम देण्याचा.
- बापूसाहेबांना ज्या ज्या राष्ट्रीय पक्षाने उमेदवारी दिली त्या-त्या निवडणुकीत त्यांनी विजयश्री खेचून आणली. मग तो पुरोगामी उदारमतवादी काँग्रेस असेल, की हिंदुत्ववादी शिवसेना असेल मराठवाड्याच्या कुठल्याही मतदारसंघात उभे राहिले तरीही लोकांनी त्यांना निवडून आणले. एवढी लोकप्रियता आजही कायम असणारे स्वाभिमानी नेतृत्व म्हणून संपूर्ण मराठवाड्यात ओळखले जातात.
- समाजाच्या सर्व थरातील असंख्य सहकाऱ्यांचे, कार्यकर्त्यांचे व्यक्तिगत प्रेम बापूसाहेबांनी संपादन केले. परभणी जिल्ह्यासह मराठवाड्यातील हजारो कार्यकर्त्यांना ते पहिल्या नावाने ओळखतात. बापूसाहेब यांचे संगठण, कौशल्य कुणाही राजकीय नेतृत्वाला हेवा वाटेल असेच आहे. मागास मराठवाड्यातील ग्रामीण भागातील जमीनदाराच्या घरात जन्मलेले बापूसाहेबांचं रुप एखाद्या राजबिंडासारखं होत, असं असूनही सरंजामशाहीची किंवा सामंतशाहीची आणि सत्तेची हवा कधी डोक्यात शिरु दिली नाही. **मराठवाडा मुक्तीसंग्रामसाठी हौतात्म्य पत्करलेले दुधगावचे स्वातंत्र्य सैनिक राऊत घराणे होय. अनेक स्वातंत्र्य सैनिकांना आर्थिक बल देत लढा कायम चालू राहिला पाहिजे, यासाठी जिंतूरच्या पंचक्रोशीत घराण्याचा अत्यंत आदरयुक्त उल्लेख केला जातो.** मूळचे जमीनदार घराणे परंतु नेहमी परोपकारी भावनेने राजकारणात उतरले. सर्वत्र डाव्या विचारांची रेलचेल तरीही सर्वसामान्यांची होरपळ. शेकाच्या या बालेकिल्ल्यात त्यांची सुरु असलेली घोडदौड थोपविण्यात दुबळ्या राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचा तिरंगा खांद्यावर घेऊन पुरोगामी उदारमतवादी, समाजवादी विचार सर्वसामान्यांपर्यंत घेऊन जाण्याचे काम या घराण्याने केले आहे. पित्याचा सेवाभाऊ सुसंस्कृतपणा अंगी आणवून आजपर्यंतच्या बापूसाहेबांनी आपल्या राजकीय जीवनप्रवासात सर्वांना सोबत घेऊनच काम केले आहे. जीवनात अनेक चढ उतार त्यांनी पाहिले.
- केंद्र आणि राज्य संबंध पक्षांतर्गत लोकशाही संस्थांची सर्व पातळीवरील उभारणी, ग्रामीण जीवनाचे प्रश्न **आदी सर्वाबाबत बापुसाहेबांची स्वतःची अशी काही मते आहेत. पक्षातील व पक्षाबाहेरील मतभेद असलेल्या मंडळीही काही मूलभूत मानवी मूल्यांचा आणि लोकशाही मूल्यांचा आधार घेऊनच वागले पाहिजे. यासंबंधी त्यांनी काही संकेत मनाशी ठरविले आहेत.** उदारमतवादी आणि लोकशाही मूल्यांवर निष्ठा असलेले बापूसाहेबांच्या ध्येयनिष्ठा यामुळे त्यांना जीवनात राजकीय संकटांना तोड देण्याची पाळीदेखील आली.
- कधीकधी जिवलग मित्रमंडळीकडूनही त्यांना टीकेचे घाव सोसावे लागले. **अनेक कार्यकर्त्यांना मोठे करण्याचा प्रयत्न केला. नव्हे मोठेपण मिळवून दिले. उच्च अधिकारपदे मिळवून देण्यास मदत केली. परंतु अशा मंडळींही बापूसाहेबांच्या जीवनातील दृष्टिकोन नीटपणे समजून घेऊ शकले नाहीत. अशापैकी काहीजण त्यांचे विरोधकही बनले हा इतिहास चार-पाच दशकांपूर्वीचाच आहे.**
- त्यांचे वागणे हे डावपेच आहे, अशा प्रकारचा गैरसमज अनेक लोकांचा होत होता. त्यांचा स्वभाव कमी बोलण्याचा. अनेक प्रश्नांवर स्वतःचेच मत स्पष्ट असतानाही उगीच गैरसमज नको म्हणून ते बोलायचे टाळतात; पण त्यामुळे त्यांच्यासंबंधी गैरसमज प्रसुत होत असत. राजकारणात हुशारीने आणि मुत्सद्देगिरीने कधीकधी वागावे लागते. हे जरी खरे असले तरी डावपेचांनी वागणे, हा बापूसाहेबांचा स्वभाव मुळीच नव्हता.
- सत्तेच्या राजकारणाच्या जंगलात राहूनही त्यांनी सुसंस्कृतपणा सोडला नाही. अनेक साहित्यिक आणि विद्वान त्यांचे मित्र आहेत. त्यांना ग्रंथांचा लोभ आहे. शब्दांवर त्यांचे प्रेम आहे. आपल्या भाषणात अनेकदा असा चपखल शब्दप्रयोग करत, की प्रत्यक्ष साहित्यिकालाही त्यांचा हेवा वाटावा. उत्तम शब्द रचनेला रसिकतेने ते दाद देतात. मराठवाड्याच्या राजकारणातले बापूसाहेब मितभाषी, संयमी, समंजस आणि उच्च

- कोटीतील चारित्र्यवान असे त्यांचे नेतृत्व आहे. सर्वसामान्याचे ते नेते आहेत, हे सर्वानाच माहीत आहे.
- त्यांच्या संस्कारक्षम मनाने मराठवाडा विकास आंदोलनाचे निर्धाराने आणि निष्ठेने नेतृत्व केले. क्रांतीपेक्षा वैचारिक परिवर्तनावर त्यांचा अधिक विश्वास आहे. संगीत, साहित्य, शैक्षणिक याबरोबरच महाराष्ट्राला राजकीय दृष्ट्या चिंतनशील, समृध्द आणि औद्योगिक दृष्टिकोन आघाडीवर नेण्यासाठी त्यांनी कसोशीने प्रयत्न केले आहेत. मराठवाडा विकास आंदोलनाच्या माध्यमातून मराठवाड्याला विशेष पॅकेज मिळावे, या भागाचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी त्यांनी रस्त्यावर येऊन संघर्ष केला. अशा संघर्षशील नेत्याचा महाराष्ट्राच्या सत्तेच्या राजकीय सारीपाटावरील राजकारण्यांनी **बापूसाहेबांना मात्र कायम मराठवाड्यासारखेच वंचित ठेवण्याचे काम हेतूपुरस्कर केले आहे. हे या ठिकाणी आवर्जुन नमूद करावेसे वाटते.**
- दारिद्र्याच्या अज्ञानाच्या पाताळात खितपत पडलेल्या शेतकऱ्यांच्या अनेक पिढ्या त्यांच्या कार्याने उभारल्या गेल्या आहेत. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी लोकशाही विकेंद्रीकरण याचे स्वप्न पाहिले. या स्वप्नाला मूर्त रुप देण्याचे काम बापूसाहेब यांनी आपल्या मंत्रिपदाच्या कार्यकाळात केले आणि राज्याची सत्ता मुंबईच्या मुख्यालयात न एकवटता दख्खनच्या पठारावरील सह्याद्रीच्या पर्वतरांगात विखुरलेल्या वाड्या-तांड्यापर्यंत विकेंद्रीकरण झाल्याशिवाय खऱ्या अर्थाने आदर्श लोकशाहीची प्रतिष्ठापना होणार नाही, याची जाणीव बापूसाहेबांना होती. याच भूमीकेतून त्यांनी तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी टाकलेल्या त्यांच्यावरील विश्वास सार्थ ठरवत मंत्रिपदाच्या विविध खात्याची धुरा सांभाळीत लोकशाही विकेंद्रीकरण समितीच्या माध्यमातून मागास प्रांत म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मराठवाड्याचा दख्खनच्या पठारावर हिरवळ उगविण्याचे काम त्यांनी लीलया पार पाडले.
- कृषी, औद्योगिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आदी क्षेत्रांचा विकास त्यांच्या कार्यकाळात झाला. **मराठवाडा विकास आंदोलनाचे हे उभरते नेतृत्व महाराष्ट्रातील उचापतीखोर राजकारण्यांना गिळंकृत करेल की काय अशी महाराष्ट्राच्या विद्यमान राजकारणात भीतीयुक्त परिस्थिती निर्माण झाली होती.** त्यामुळे राजकीय सारीपाटावरील कच्छपी पडलेल्या दिग्गजांनी या कर्तृत्वशील नेतृत्वाला डावलण्याचे पध्दतशीर प्रयत्न चालू ठेवले.
- तरीही बापूसाहेब त्यांच्या डावपेचांचे केव्हाही बळी ठरले नाहीत. आपल्या सवंगड्यांसह प्रत्येक राजकीय सारीपाटावरील विरोधकांचे डाव पालटून टाकण्याचे काम केले, अशा या मराठवाड्याच्या खंबीर नेतृत्वाने देण्याचे काम केले.
- मराठवाड्याला खऱ्या अर्थाने आत्मभान देणाऱ्या कर्मयोगी बापूसाहेबांना उदंड आयुष्याच्या अनंत कोटी शुभेच्छा.





राजकिय वटवृक्ष ठरलेल्या
ॲडव्होकेट गणेशराव दुधगावकर
(बापूसाहेब) यांच्यावरील
दोन संपुर्ण लेख

# मराठवाड्याचे कर्मवीर : ॲडव्होकेट गणेशराव दुधगावकर (बापूसाहेब)


**वरिष्ठ पत्रकार श्री. भिमराव हटकर, नांदेड यांचा लेख**

''राष्ट्रीय सरासरीपेक्षा जवळपास दीडपटीने जास्त प्रश्न बापूसाहेबांनी सभागृहात विचारुन जनतेचा आवाज शासनकर्त्यापर्यंत पोहचविला आहे.''

**बापूसाहेबांनी सभागृहात मांडलेले प्रश्न :**

1. दुष्काळ व टंचाई परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना वाजवी किंमतीत बी-बियाणे व खत पुरवठा करावा. (दि.19-08-2010)
2. नवीन होणाऱ्या भूसंपादन कायदा 2011 मध्ये शेतकऱ्यांना उचित मावेजा मिळावा व त्यांचे आर्थिक हित जोपासले जावे.
3. 2009 मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे व गोदावरी नदीच्या पुरामूळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना व इतर पिडीतांना आर्थिक सहाय्य देण्यात यावे. (दि. 09-12-2009)
4. परभणी येथील वसंतराव नाईक कृषी विद्यापीठात मेगा फुड पार्कची उभारणी करावी. (दि.10-08-2010)
5. राज्यातील **धनगर समाजाला अनुसूचित जमाती प्रवर्गात समाविष्ठ** करुन त्यांना त्या प्रवर्गाच्या सर्व सोयी सवलती द्याव्यात. (दि. 5-12-2012)
6. केंद्रीय शिक्षण संस्था (प्रवेशातील आरक्षण) दुरुस्ती विधेयक 2020 वरील चर्चेत **सहभागी होऊन आरक्षणाच्या बाजूने विचार मांडले.** (दि.16-05-2012)
7. मेहकर तालुक्यातील लोणार सरोवराला राष्ट्रीय पर्यटनाचा दर्जा देऊन विकास करण्यात यावा. (दि. 27-07-2009)
8. अतिवृष्टीमुळे आणि पुरपरिस्थिती उद्धवलेल्या डेंग्यू, मलेरिया, कावीळ, चिकनगुणिया इत्यादी रोगराईने त्रस्त जनतेला केंद्राने वैद्यकीय मदतीचे पॅकेज द्यावे. (दि. 30-11-2010)
9. नांदेड ते पैठण हा राष्ट्रीय महामार्ग 220 करावा. (दि. 20-12-2011)
10. परभणी जिल्ह्यातून जाणारा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 222 हा चौपदरी करावा. (दि. 22-08-2012)

बापूसाहेबांनी लोकसभेत विचारलेल्या 418 प्रश्नांपैकी वरील दहा प्रश्न आणि त्यांचे स्वरुप पाहिले तर प्रत्येक प्रश्नातून बापूसाहेबांची सामाजिक जाण, बांधिलकी आणि विकासाची दृष्टी अशा अनेक बाबी त्यातून दृष्टीपथात येतात. लोकसभा असो की विधानसभा प्रश्न विचारणे चर्चेत भाग घेणे **इत्यादी संसदीय आयुधांचा वापर बापूसाहेबांनी जनसामान्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी केल्याचे दिसून येते.**



# ज्ञानोपासक गणेशराव दुधगांवकर

– श्री. स. सो. खंडाळकर

विशेष प्रतिनिधी, लोकमत, औरंगाबाद

हाफ दाढी... टोकदार मिशावाला... उंचापुरा, धिप्पाड अशा व्यक्तिमत्त्वाचा धनी म्हणजे गणेशराव दुधगांवकर. एखाद्या मराठी चित्रपटात व्हिलनची भूमिका करण्याची संधी मिळाली असती तर त्याला गणेशरावांनी नक्की न्याय दिला असता. हा गमतीचा भाग सोडला तर खऱ्या अर्थानं गणेशराव दुधगांवकर हे 'हिरो' आहेत. विशेषत: शैक्षणिक क्षेत्रातील त्यांची भरीव कामगिरी बघता ते शिक्षणमहर्षीच आहेत. सहकार क्षेत्रातलं त्यांचं काम पाहता, त्यांना सहकारमहर्षी म्हटल्यास वावगं ठरु नये.

गणेशराव दुधगांवकर हे ज्ञानोपासक आहेत, हे वेगळं सांगायला नको. त्यांनी स्थापन केलेल्या शाळा, महाविद्यालये व वसतिगृहांच्या नावांवर सहज नजर टाकली तर याची साक्ष पटल्याशिवाय राहणार नाही. आपल्या प्राणप्रिय संस्थांना 'ज्ञानोपासक' असं नाव देणं, ही सहज घडणारी गोष्ट नव्हे. ती जाणीवपूर्वक केलेली बोलकी कृती !

**'ज्ञानोपासक' या शब्दात सारं काही समावलेलं आहे. हा शब्दच अर्थपूर्ण. तो पकडून गणेशराव दुधगांवकर हा जणू छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा जोतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज, सयाजीराव गायकवाड आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा वारसा अधोरेखित करीत आहेत, हे स्वागतार्ह तर आहेच, तेवढीच अभिनंदनीय व अभिमानास्पद घटना होय. मला तर खरे गणेशराव इथं उठून दिसताहेत. याच ज्ञानोपासक गणेशराव उर्फ बापूसाहेबांचा समाजाला खरा उपयोग झाला असल्याचे दिसून येईल. त्यामुळेच त्यांच्या हातून एक नव्हे कितीतरी पिढ्या घडल्या, हे त्यांचं कार्य अतुलनीयच.** म्हणूनच परभणी, जिंतूर, सेलू, मानवत, पाथरी हा सारा परिसर किंबहूना सारा मराठवाडा गणेशराव दुधगांवकर यांच्या कर्तृत्वाचे गीत गायल्याशिवाय राहणार नाही.

ख्यातकीर्त कवी प्रा.फ.मुं. शिंदे, प्रख्यात बासरीवादक दिवंगत प्रा. दत्ता चौगुले आणि शिक्षणाचा कसलाही वारसा नसलेले पण फ.मुं. आणि चौगुले यांचे बोट धरुन त्याकाळी एम.ए. पर्यंत शिकलेले धों.ज. गुरव यांच्या तोंडून गणेशराव दुधगांवकर यांचं नाव सतत येत असे. हेल्पिंग नेचरच्या गणेशराव यांचे किस्से ऐकावयास मिळत असत. **परभणीला ही सारी मंडळी शिकायला असताना गणेशरावांचं मोलाचं सहकार्य मिळत गेलं. ही मंडळी, हे सहकार्य विसरतो म्हटलं तरी विसरु शकत नाही.**


ते तेवढंच खरं की फाईव्हस्टार हॉटेलमध्येही मिळणार नाही अशा धों.ज. गुरव यांच्या हातच्या खास मराठवाडी आमटीची चर्चा आजही फ.मुं. सर, डॉ. नागनाथ कोत्तापल्ले सर, प्रा. शेख शफी सर, प्रा. अजित दळवी सर आणि स्वत: गणेशराव दुधगांवकर तेवढ्याच चवीनं करतात, हे एक आगळंवेगळं वैशिष्ट्य म्हणावं लागेल.

गणेशराव दुधगांवकर यांनी राजकारणात चमकदार कामगिरी केली नसती तर नवलच. दोन टर्म आमदारकी आणि एक टर्म खासदारकी त्यांच्या वाट्याला आली. ती त्यांनी मराठवाड्याच्या विकासासाठी कारणी लावली.

देशाचं, महाराष्ट्राचं सुसंस्कृत नेतृत्व यशवंतराव चव्हाण आणि वसंतदादा पाटील हे गणेशरावांचे आदर्श. वसंतदादा पाटील यांच्या मंत्रिमंडळात तर गणेशरावांना तंत्रशिक्षण, रोजगार हमी योजना व सेवायोजन या खात्याची जबाबदारी सांभाळण्याची संधी मिळाली. **या संधीचं सोनं करणार नाही, ते गणेशराव कसले...** त्यांनी 45 आयटीआय, 45 टेक्निकल हायस्कूल्स तसेच उदगीर आणि निलंगा येथील अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या माध्यमातून जणू त्यांनी त्याकाळी मराठवाड्यात तंत्र शिक्षणाची गंगाच खेचून आणली. यात गणेशरावांच्या दूरदृष्टीचा तर प्रत्यय येतोच. पण त्यांचं शिक्षणावरचं अतीव प्रेमही लक्षात येतं. या अर्थानंही बघितल्यास गणेशराव हे 'ज्ञानोपासक'च ठरतात.

मंत्री असताना औरंगाबादला ते अनेकदा आलेले. काँग्रेसच्या शहागंजातील गांधी भवनात आयोजित कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात त्यांची भाषणं ऐकण्याची संधी मला लोकमतचा प्रतिनिधी म्हणून मिळालेली. ते मला एक सहृदयी, सामाजिक भान असलेले राजकारणी वाटले.

प्रचंड लोकसंग्रह असलेल्या या नेत्याचा राजकीय प्रवास कसाही झाला असला तरी तो खरा 'ज्ञानोपासक' आहे, चांगला माणूस आहे, चांगला मित्र आहे, हे त्यांचा शत्रूही नाकारणार नाही. या ज्ञानोपासकाला उदंड आयुष्य मिळो, त्यांच्या हातून उत्तमोत्तम चांगली कामगिरी घडो, अशा मनापासून आभाळभर शुभेच्छा...!



## गौरवग्रंथ सारांश

पद । लोकनेता । उभारणी । समजूतदार जनसेवक । बापूसाहेबांच्या शब्दांत

### साथीदारांच्या शब्दांतील बापूसाहेब...

श्री. गणेशराव

गौरवग्रंथ सारांश

**गौरवग्रंथ सारांश वाचण्यासाठी स्कॅन करावे.**

**शब्दांकन "कर्मयोगी श्री. गणेशराव नागोराव दुधगावकर उपाख्य बापूसाहेब" अमृतमहोत्सव गौरवग्रंथातून घेतले आहे.**

# मराठवाड्याचे कर्मवीर गणेशराव दुधगावकर कारकीर्द



* सन 1965 राजकीय जीवनाची पायाभरणी करणारे जनरल सेक्रेटरी पद, श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी
* डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात विद्यार्थी संघटना, सिनेट कार्यकारी मंडळ सदस्य
* परभणीच्या मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या कार्यकारी मंडळ सदस्य
* सन 1955 पासून परभणी जिल्हा परिषदमध्ये एक महत्त्वपूर्ण गट
* **सन 1980 चे आमदार (काँग्रेस) –**

  वसमत विधानसभा मतदारसंघ, जिल्हा हिंगोली (जुना जिल्हा परभणी)
* **सन 1983 राज्यमंत्री (स्वतंत्र कार्यभार) –**

  – रोजगार हमी योजना, तंत्र शिक्षण, सेवायोजना खाते, महाराष्ट्र राज्य

  मा.ना. श्री. वसंतदादा पाटील, मुख्यमंत्री व मा.ना. श्री. रामराव आदिक, उपमुख्यमंत्री यांचे मंत्रिमंडळ

  **– अमरावती आणि बुलढाणा दोन्ही जिल्ह्यांचे पालकमंत्री**
* प्रमुख पाहूणे, मराठवाडा पातळीवर संत जनाबाई साहित्य संमेलन, गंगाखेड

  त्यावेळेस आराखड्याबाबत बापूसाहेब ताडकन म्हणाले, ''अरे एवढ्या रकमेनं काय होतय? जरा मोठा आराखडा करा आणि एक दिवसीय नाही आपण दोन दिवसाचे शानदार भव्य साहित्य संमेलन घेऊ.''
* **सन 1985 चे आमदार (काँग्रेस)**


  जिंतूर विधानसभा मतदारसंघ जि.परभणी
* **15व्या लोकसभा सदस्य (सन 2009-2014) (शिवसेना)**

  – केंद्र सरकारच्या कोळसे, खाण आणि पोलाद या स्थायी समितीचे सदस्य

  – संसदीय कामकाजात सर्वाधिक उपस्थितीचा विक्रम
* अध्यक्ष, 1960 स्थापित जिंतूर तालुका सहकारी जिनिंग प्रेसिंग संस्था,जिंतूर
* चेअरमन, ज्ञानोपासक नागरी सहकारी बँक, परभणी
* अध्यक्ष व संचालक, महाराष्ट्र राज्य पणन महासंघ
* अध्यक्ष, 1975 स्थापित जि.स. खरेदी विक्री संघ, परभणी
* संचालक, म.रा.स. मार्केटिंग फेडरेशन, मुंबई सन 1978
* **निधी अभावी रखडलेले पाथरी आणि पूर्णा सहकारी साखर कारखाने सुरु केले.**
* **संस्थापक, 1989 स्थापित नृसिंह सहकारी साखर कारखाना, लोहगाव**
* **संस्थापक/अध्यक्ष–PAFFCO खत कारखाना जिंतूर सन 1989 ते 2001**
* **चेअरमन, म.रा.स. मार्केटिंग फेडरेशन, मुंबई सन 1989**
* संचालक, दुधगाव वि.का.से.स.सो. ता. जिंतूर
* संचालक, IFFCO नवी दिल्ली सन 1989
* संचालक, नाफेड सन 1987-88
* संचालक, कृषक भारती को.सो. सन 1989
* **अनेक समाजातील कार्यकर्त्यांना आमदार बनविणारे नेतृत्व**

**श्री. गणेशराव**

**गौरवग्रंथ सारांश**



# दिनविशेष

## जानेवारी

13 (2018) नवीन शिक्षा पद्धतीसाठी सुचना देण्याकरीता महाराष्ट्र चेंबर उपाध्यक्ष समीर दुधगावकर यांनी देशातील मोठ्या उद्योग संघटनांचे शिष्टमंडळ घेवून AICTE अध्यक्ष अनिल सहस्त्रबुद्धे यांना निवेदन दिले

16 (1681) छत्रपती संभाजी महाराज राज्याभिषेक

19 (1984) बजाज ऑटो वाळुज भूमिपूजन

26 प्रजासत्ताक (गणतंत्र) दिन

## फेब्रुवारी

07 (1983) विकासपुरुष गणेशराव दुधगावकर मंत्रीपद शपथग्रहण

11 (1771) श्रीमंत महाराज महादजी शिंदे (सिंधिया) दिल्ली तख्त काबीज

19 छत्रपती शिवाजी महाराज जयंती (तारखेनुसार)

21 (1975) मराठवाडा विकास आंदोलनाची एक मागणी पुर्ण, मराठवाड्याचे व्यक्ति श्री. शंकरराव चव्हाण प्रथमत: मुख्यमंत्रीपदी शपथ

26 जुन्या उस्मानाबाद जिल्ह्याचे भाग्यविधाते
सहकार महर्षी कै. शिवाजीराव नाडे (मुरुड) जयंती

## मार्च

02 सन 1990 मध्ये मंजूर केलेल्या मध्य भारताच्या इतिहासातील सर्वात मोठा विकास प्रकल्प हाजिरा - मराठवाडा - विदर्भ - ओरिसा गॅस पाईप लाईन प्रकल्पाचे पुढचे पाऊल पडले. (2022) केंद्र सरकार कडून बुलढाणा- छ. संभाजीनगर - अहील्यानगर टप्प्याचे भुमीपूजन संपन्न

04 (1984) गंगाखेड तालुक्याच्या जनतेला हेलिकॉप्टरचा अनुभव. उपमुख्यमंत्री श्री. आदीक, मंत्री गणेशराव दुधगावकर यांच्या नेतृत्वात धारासुर शेतकरी मेळावा

11 धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज बलिदान दिन

27 (1974) मराठवाडा विकास आंदोलन ठिणगी, वसमतनगर येथील गोळीबारात जिंतूरच्या दोन व्यक्तिंचा मृत्यु

## एप्रिल

22 (1965) पंडित दिनदयाल उपाध्याय एकात्म मानव-वाद संबोधन

## मे

01 (1983) पालकमंत्री श्री गणेशराव दुधगावकर यांच्या नेतृत्वात अमरावती विद्यापिठ निर्मिती

13 (2009) 19 वर्षाच्या खंडानंतर खासदार म्हणून विकासपुरुष गणेशराव दुधगावकर विजयी घोषित

29 (2023) बजाज ऑटो उपाध्यक्ष मधुर बजाज यांच्या दिव्य मराठी मुलाखतीतुन स्पष्ट - **"शासनाने वाळुज येथे खास सवलती दिल्या म्हणून बजाज ऑटो कारखाना 1984 मध्ये टाकला"**. दहा हजार कोटी GST भरण्याचे श्रेय बजाज वाळुजमुळे झालेल्या औद्योगिक क्रांतीला, बजाज वाळुजला आणण्याचे श्रेय तत्कालीन उपमुख्यमंत्री/ उद्योगमंत्री रामराव आदिक, प्रभावी मंत्री गणेशराव दुधगावकर यांना.

## जून

02 (1971) हुंडा न घेता, सुशिक्षित मुलीसोबत लग्न करायचे हा विचार करणाऱ्या गर्भश्रीमंत कुटूंबातील गणेशराव दुधगावकर यांचा सामान्य कुटूंबातील संध्या श्रीधरराव कदम यांच्यासोबत उदगीर येथे विवाह संपन्न. संध्या यांना पुढे Ph.D. पर्यंत शिकविले. सुपुत्र समीर यांनीही पुढे हुंडा न घेता २००३ मध्ये लग्न केले.

04 लोकसभा 2024 निकाल : मराठा आरक्षण आंदोलनाचा अपमान केल्यामुळे मराठवाडा भाजप - मुक्त झाला.

## जून

11 सहकार महर्षी कै. शिवाजीराव नाडे पुण्यतिथी

11 (2016) भारतीय अर्थव्यवस्थेतील 75 टक्के वाटा हा पिढीजात कौटुंबिक उद्योगांचा आहे. कालपरत्वे पिढीजात उद्योगाला - वारसा, पिढीतले अंतर, परंपरागत विरुद्ध आधुनिक विचारसरणी, बंधू-मित्रातले मतभेद व कार्य पद्धती अशा अनेक अडचणी व्यवसायास खिळ बसवितात. या महत्त्वाच्या विषयावर महाराष्ट्र चेंबर तर्फे राज्यस्तरीय प्रशिक्षण कार्यशाळा करण्याची सुरुवात. छ. संभाजीनगर येथे कार्यशाळा संपन्न चेंबर अध्यक्ष शंतनु भडकमकर, उपाध्यक्ष समीर दुधगावकर, निलेश कपाड़िया यांचा पुढाकार

28 (2024) भाजप - मुक्त मराठवाडा झाल्याने हादरलेल्या महायुती कडुन 9 वर्षे दुर्लक्षित करण्यात आलेल्या "मागेल त्याला सौर कृषिपंप योजनेला" अपेक्षित स्वरुप. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्समुळे राज्य अर्थसंकल्प 2015 (मार्च 18) मध्ये घोषित झालेली योजना अखेर राज्याच्या सर्व शेतकऱ्यांसाठी मंजुर.

## जुलै

31 (2024) महायुतीच्या लोकसभा 2024 मधिल दारुण पराभवानंतर मराठवाड्यातील औद्योगिक क्रांतिचे दुसरे पाऊल, टोयोटा-किर्लोस्कर कारखान्याची छत्रपती संभाजीनगर साठी घोषणा

## ऑगस्ट

15 भारतीय स्वातंत्र्य दिन

15 (1983) पालकमंत्री श्री गणेशराव दुधगावकर यांच्या नेतृत्वात अमरावती महानगरपालिकेची स्थापना

## सप्टेंबर

01 (2023) मराठा आरक्षण आंदोलन पेटविणारा आंतरवली सराटी आंदोलकांवर लाठिचार्ज

17 मराठवाडा मुक्ती संग्राम दिन

29 (2016) महाराष्ट्र चेंबर तर्फे केंद्रिय रेल्वे खात्याकडे समीर दुधगावकर यांच्या माध्यमातून पुढील मागण्यांचा दिवस -
मराठवाडा मध्य रेल्वेत जोडणे, परभणी-मनमाड-कल्याण रेल्वे लाईन वाढविणे, पुर्णा जंक्शन येथील रेल्वे हॉस्पिटल आणि कोच दुरुस्ती कारखाना, परभणी-परळी दुहेरिकरण.

## ऑक्टोंबर

14 अंतरवली सराटी येथील ऐतिहासिक, न भुतो न भविष्यती एक कोटी पेक्षा जास्ती उपस्थित लोकांची मराठा आरक्षण मागणीसाठी सभा, समीर दुधगावकर यांचासुद्धा सहभाग

## नोव्हेंबर

05 (1985) 18 महिन्यांच्या विक्रमी काळात उभारलेल्या बजाज ऑटो वाळूज कारखान्याचे राष्ट्रपतींच्या हस्ते उद्घाटन

17 (1991) अर्ध्या महाराष्ट्राचे औद्योगिकरण करु शकला असता अशा हाजिरा गॅस पाईपलाईन प्रकल्प राजकिय घडामोडिंच्या नादात दुर्लक्षित झाला. मंजुरीत विकासपुरुष श्री गणेशराव दुधगावकर अग्रेसर होते

26 (1951) भारतीय संविधान दिन

## डिसेंबर

09 महाराणी ताराबाई मोहिते भोसले यांची पुण्यतिथी (1675-1761)

28 (2024) मागेल त्याला सौर कृषीपंप-2015 योजना मंजुरीत महाराष्ट्र चेंबरचा निर्णायक सहभाग या अनुभवाबद्दल तत्कालिन चेंबर अध्यक्ष राम भोगले यांची फेसबुकवर पोस्ट. लोकसभा 2024 पराभवानंतर महायुतीकडून योजनेला अपेक्षित स्वरुप